



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक १४२ * नांदेड * शुक्रवार, दि. २९ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# ‘नीट’ पेपरफुटी रोखण्यासाठी आता थेट लष्कर मैदानात

## वायूदलाच्या विमानांनी पोहोचवणार पेपर



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशभरात सातत्याने गाजत असलेल्या वैद्यकीय प्रवेशासाठीच्या ‘नीट’ परीक्षेतील घोटाळे आणि पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आता पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आलं आहे. आगामी २१ जून रोजी होणारी नीटची फेरपरीक्षा अत्यंत पारदर्शक, सुरक्षित आणि योग्य रितीने पार पाडण्यासाठी सरकारनं थेट भारतीय लष्कराची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. इतकंच नव्हे, तर देशातील सर्व परीक्षा केंद्रांवर गोपनीय पेपर्स सुरक्षितपणे पोहोचवण्यासाठी भारतीय वायूदलाची मदत घेतली जाणार आहे.

‘नीट’च्या फेरपरीक्षेच्या नियोजनासंदर्भात गुरूवारी देशाची राजधानी दिल्लीमध्ये एक अत्यंत उच्चस्तरीय आणि महत्त्वाची बैठक पार पडली. केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अधिकृत निवासस्थानी ही बैठक पार पडली. या महत्त्वपूर्ण बैठकीला केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया, एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह, सीबीएसईचे वरिष्ठ अधिकारी आणि पंतप्रधान कार्यालयातील काही वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

परीक्षेतील वाढते गैरप्रकार रोखण्यासाठी आणि देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचा तसेच पालकांचा विश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारने कंबर कसली आहे. या बैठकीत नीट परीक्षा अधिक पारदर्शक आणि ‘फुलप्रूफ’ करण्याबाबत विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली.

परीक्षा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर तांत्रिक सुधारणा केल्या जाणार असून, संवेदनशील परीक्षा केंद्रांवर कडक पहारा ठेवण्यात येणार आहे. पेपर लीकचा कोणताही मार्ग उरणार नाही, अशा प्रकारे तांत्रिक आणि मानवी सुरक्षा यंत्रणा तैनात केली जाईल. पेपर वाहतुकी दरम्यान होणारे गैरप्रकार टाळण्यासाठीच वायूदलाच्या विशेष विमानांची मदत घेतली जाणार आहे.

‘नीट’ परीक्षेतील गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर देशभरातून मोदी सरकारवर जोरदार टीका झाली होती. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ होत असल्याच्या तक्रारींनंतर आता खुद्द गृह आणि संरक्षण यंत्रणा या परीक्षेत लक्ष घालत आहेत. लष्कर आणि वायूदलाच्या थेट सहभागामुळे परीक्षा केंद्रांवर पेपर पोहोचण्यापासून ते परीक्षा संपेपर्यंत कडेकोट बंदोबस्त असणार आहे. आता २१ जूनच्या फेरपरीक्षेत कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी यंत्रणा दिवसरात्र काम करत आहे.

दुसरीकडे, देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या ‘नीट’ पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाला आता मोठ्या आर्थिक व्यवहारांची जोड मिळताना दिसत आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित अटक आरोपी शिवराज मोटेगांवकर आणि त्याच्या कुटुंबीयांशी संबंधित बँक खाती आणि लॉकर्सची पडताळणी आता केंद्रीय अन्वेषण विभागाकडून सुरू करण्यात आली आहे.

सीबीआयचे पथक या लॉकर्समध्ये मोठी रोख रक्कम, बेकायदेशीर मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे, डिजिटल पुरावे आणि बँक व्यवहारांची माहिती शोधत आहे. या आंतरराज्यीय पेपर लीक रॅकेटच्या आर्थिक व्यवहारांशी संबंधित महत्त्वाचे दस्तऐवज सीबीआयच्या हाती लागण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

# आंतरवालीत रखरखत्या उन्हात बाज टाकून बसणार, अन्न-पाणी घेणार नाही

- उन्हात तडफडून मेलो तरी चालेल
- मनोज जरांगे पाटील यांचा इशारा



**जालना (प्रतिनिधी)–** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी येत्या ३० मेपासून आंतरवाली सराटीत रखरखत्या उन्हात आमरण उपोषण करणार असल्याचं जाहीर केलं आहे. सरकारला गेल्या १० महिन्यांपासून वेळ दिला होता, त्या काळात सातारा गॅझेटिअरवर जीआर काढला गेला नाही, असं जरांगे यांनी म्हटलं. उन्हात आमरण उपोषणाला बसणार असून मेलो तरी चालेल, असं मनोज जरांगे म्हणाले. मला चर्चा नकोय, आरक्षणाची अंमलबजावणी पाहिजे, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी सरकारला १० महिने वेळ दिल्याचं सांगितलं. माझा नाईलाज आहे,मला कोणाला दोष द्यायचा नाही, आपल्या लेकराला, समाजाला मिळत नसेल तर आपण कठोर भूमिका घेणं गरजेचं आहे. मी सीमारेषेवर आलेलो आहे, ३० मे चं आमरण उपोषण ठरवलं आहे, त्यात बदल केला आहे. आमरण उपोषण सावलीत, मंडपात, फॅनमध्ये आपण ते करत होतो, सगळे तसेच करतात. मला अंतिम टोकाचं आणि कठोर आमरण उपोषण करायचं आहे, रखरखत्या उन्हात हे उपोषण बाज टाकून करणार आहे. ना कुठलं पाणी, ना कुठलं जेवण, ना पायात चप्पल घालणार, असं मनोज जरांगे म्हणाले.

माझ्या शरीरात प्रचंड वेदना आहेत, या जीवाला तरसाचं किती दिवस, जे काही होईल ते होईल, उष्माघाताचा बळी गेला तर देवेंद्र फडणवीसांमुळं गेला, सरकारमुळं गेला. कितीही जीवाची लाही लाही झाली तरी हरकरत नाही, कारण माझ्या समाजाच्या लेकरांच्या आयुष्याचा उन्हाळा झालाय, तर आपण आपली कदर का करायची, असं मनोज जरांगे म्हणाले.

आमरण उपोषण कुठेही होईल, जंगलात होईल, रानात होईल, कडक उन्हात ते उपोषण होईल यावर मी ठाम आहे. किती वेदना होतील याचा विचार करायचा नाही हे ठरवलं आहे. सारखी सारखी उपोषणं करुन जीवाला वेदना होत आहेत. एकदा तुकडा पडूदेत, सरकारचा तुकडा पडेल किंवा माझा तुकडा पडेल. हे आंदोलन सुरु आहे त्याला तीन वर्ष झालेत. मे महिन्याच्या कडक रखरखत्या उन्हात हे आमरण उपोषण होणार आहे, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं.

माझ्या समाजाच्या लेकराचा उन्हाळा होतोय, ते कुठेतरी थांबलं पाहिजे. आमरण उपोषण फायनल झालं आहे, यात बदल होणार नाही. मराठा समाजानं अंतरवाली सराटीकडे येऊ नये, असंही मनोज जरांगे यांनी आवाहन केलं आहे. देशात इतकं टोकाचं आमरण उपोषण झालं असेल असं वाटत नाही, असंही जरांगे यांनी म्हटलं.

# सिद्धारमय्या यांचा मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा; डी.के. शिवकुमार होणार नवे सीएम

**बंगळुरू (प्रतिनिधी)–** गेल्या काही दिवसांपासून कर्नाटकच्या राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या सर्व चर्चा आणि तर्क-वितर्कांना अखेर पूर्णविराम मिळाला आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धारमय्या यांनी आपल्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या सूचनेनुसार मी हे पाऊल उचलल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. हायकमांडने मला जसं सांगितलं तसं केलं, असं म्हणताना सिद्धारमय्या काहीसे भावुक झाल्याचं दिसून आलं. त्यांच्या राजीनाम्यानंतर आता डी.के. शिवकुमार यांच्याकडे मुख्यमंत्रिपद जाणार आहे.

मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देताना सिद्धारमय्या कमालीचे भावुक झाले होते. २००६ मध्ये काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यापासून ते आतापर्यंत मिळालेल्या अफाट समर्थनाबद्दल त्यांनी सोनिया गांधी, राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह काँग्रेस कार्यकर्ते, आमदार आणि खासदारांचे जाहीर आभार मानले. ते म्हणाले की, देशात संविधान सर्वोच्च आहे आणि आम्ही नेहमीच संविधानाने दाखवलेल्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न केला आहे. कर्नाटकातील जनतेने आम्हाला नेहमीच भरभरून प्रेम दिले, आमचे समर्थक आणि हितचिंतक प्रत्येक कठीण प्रसंगात आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. या प्रवासात मला दोन वेळा राज्याचा मुख्यमंत्री आणि दोन वेळा विरोधी पक्षनेता बनण्याची संधी लाभली. सोनिया गांधी, राहुल गांधी आणि आमचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी माझ्यावर विश्वास दाखवून मला ही संधी दिली, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. काँग्रेस पक्ष सोबत नसता, तर मी कधीच मुख्यमंत्री बनू शकलो नसतो, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

# आ. चिखलीकर यांनी घेतली खा. श्रीकांत शिंदे यांची भेट

**नांदेड (प्रतिनिधी)–** शिवसेनेचे संसदीय गटनेते खा. श्रीकांत शिंदे हे नांदेड दौऱ्यावर आले असता लोहा-कंधारचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी त्यांची भेट घेतली. या भेटीत नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीबाबत चर्चा झाल्याचे समजते.




शहराच्या जुना कौठा येथील संवाद मेळावा बैठक संपल्यानंतर रात्री उशिरा खासदार श्रीकांत शिंदे यांची विश्रामगृहात आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी भेट घेतली. या भेटीदरम्यान विधान परिषदेच्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीबाबत खलबतं झाल्याचे समजते.

यावेळी आ. हेमंत पाटील, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंद पाटील बोंढारकर, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, माजी आ. अविनाश घाटे, शिवराज पाटील होटाळकर, बाळासाहेब पाटील रावणगावकर, माधव पावडे, प्रवीण पाटील चिखलीकर यांची उपस्थिती होती.

# ‘नीट’ परीक्षा रद्द झाल्याने १८ वर्षीय विद्यार्थ्यानं संपवलं आयुष्य

**गंगाखेड (प्रतिनिधी)–** ‘नीट’च्या परीक्षेत पास होणार की नाही, या भीतीने एका १८ वर्षीय विद्यार्थ्याने विष प्राशन करून आपला जीवन प्रवास संपवल्याची धक्कादायक घटना परभणी जिल्ह्यात घडली आहे. गंगाखेड तालुक्यातील गोदावरी तांडा येथे हा हृदयद्रावक प्रकार उघडकीस आला आहे.

प्रथमेश राठोड असे आत्महत्या केलेल्या या दुर्दैवी तरुणाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार, प्रथमेश हा वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न उराशी बाळगून ‘नीट’ परीक्षेची जोरदार तयारी करत होता. यासाठी तो नांदेड येथे राहून खासगी क्लासेस करत होता. मात्र, जसजशी परीक्षा जवळ येत होती, तसतसा त्याच्यावरील ताण वाढत चालला होता. अभ्यासाचा ताण आणि आपण या कठीण परीक्षेत यशस्वी होऊ की नाही, ही भीती त्याच्या मनात घर करून बसली होती. याच नैराश्यातून अवघ्या चार दिवसांपूर्वी तो नांदेडहून आपल्या गावी (गोदावरी तांडा) परतला होता. घरी आल्यानंतरही तो याच तणावाखाली वावरत होता. अखेर या नैराश्यापोटी त्याने विष प्राशन करून आपले जीवन संपवण्याचा अत्यंत टोकाचा निर्णय घेतला.

# नांदेडला शिवसेनेकडून मंत्रीपद, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे योग्यवेळी निर्णय घेतील- खा. डॉ. शिंदे

**नांदेड (प्रतिनिधी)–** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे लवकरच नांदेड जिल्ह्याला मंत्रीपद, देतील असा विश्वास खासदार श्रीकांत शिंदे यांनी नांदेड येथे व्यक्त केला. राज्यात बारा वर्षांपासून शिवसेना सत्तेत आहे, पण नांदेडला मंत्रीपद मिळाले नाही. नांदेडला मंत्रीपद द्यावे, अशी मागणी शिवसैनिकांनी शिवसंवाद बैठकीत केली. यावर योग्यवेळी पक्ष नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे निर्णय घेतील असे त्यांनी सांगितले.




नांदेड शहरात शिवसेना शिंदे गटाचा शिवसंवाद दौरा बुधवार, दि. २७ मे रोजी रात्री आठ वाजता पार पडला. नांदेड दक्षिण, नांदेड उत्तर आणि लोहा विधानसभा मतदारसंघाचा आढावा शिवसेना नेते तथा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी घेतली. यावेळी पक्ष संघटना आणखीन कशी मजबूत होईल, त्या अनुषंगाने काय काय करावं लागेल याचा आढावा घेतला.

खा. शिंदे म्हणाले, प्रत्येक कार्यकर्त्याला तसे वाटतं असते, मात्र योग्य पदाधिकाऱ्याला योग्यवेळी न्याय देण्याचे काम पक्ष नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे करीत असतात, त्यामुळे योग्यवेळी योग्य पदाधिकाऱ्याला न्याय देतील असा मला विश्वास आहे.

तर विधान परिषद निवडणुकीसाठी महायुती समन्वय समितीच्या बैठका होत आहेत. लवकरच आपल्याला कळेल की, राज्यात कोण्या पक्षाला किती जागा मिळतील. राज्याचे शिष्टमंडळांची कांद्याच्या प्रश्नावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावरोवर बैठक झाली. यात जलजीवन मिशनची चर्चा ही झाली, यात सरकारने कांद्यासाठी निर्णय सुद्धा घेतला आहे, असे ते म्हणाले.

तर हिंगोली, परभणीच्या विधानपरिषदेच्या जागेवर भाजप दावा करत आहे. या प्रश्नावर खा. शिंदे म्हणाले, प्रत्येक कार्यकर्त्याची लढण्याची ईच्छा असते, पण निर्णय हे वरिष्ठ घेत असतात. तब्बल बारा वर्षांपासून शिवसेना सत्तेत पण नांदेडला मंत्रिपद मिळाले नाही. याची खंत शिवसैनिकात आहे. तर नांदेडात भाजपचा वारू रोखायचा असेल तर मंत्रीपदाचा विचार करावा, या मागणीवर खा. शिंदे यांनी, यावर योग्यवेळी योग्य निर्णय पक्ष नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे घेतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


या बैठकीला आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजीराव कल्याणकर, आमदार आनंदराव बोंढारकर, माजी आमदार शंकर धोंडगे, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, विनय गिरडे, गंगाधर बडूरे यांच्यासह शिवसेनेचे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्विमिंग टँकमध्ये बुडून अल्पवयीन मुलाचा मृत्यू

**किनवट (प्रतिनिधी)–** शहरातील इस्लामपूरा परिसरात नदीकाठी असलेल्या एका खासगी स्विमिंग टँकमध्ये बुडून १० ते १२ वर्षीय अल्पवयीन मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी दि.२८ दुपारी घडली. ज्ञानेश्वर गजानन चेंद्रे असे मृत मुलाचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



किनवट येथील ज्ञानेश्वर चेंद्रे हा आपल्या काही मित्रांसोबत पोहण्यासाठी इस्लामपूरा भागाच्या मागील बाजूस नदीकिनारी असलेल्या स्विमिंग टँकवर गेला होता. टँकमधील पाणी गढूळ असल्याने त्याला पाण्याची खोली लक्षात आली नाही. पोहत असताना तो अचानक खोल पाण्यात गेला व बुडाला. सोबत असलेल्या मुलांनी आरडाओरड केल्यानंतर स्थानिकांनी त्याला तातडीने बाहेर काढून गोकुंदा येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. ज्ञानेश्वरचे वडील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) किनवट आगारात चालक म्हणून कार्यरत असल्याची माहिती मिळाली आहे. या घटनेनंतर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे. दरम्यान, संबंधित स्विमिंग टँक अनाधिकृत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू असून, अशा ठिकाणी सुरक्षेच्या उपाययोजनांचा अभाव असल्याबद्दल संताप व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.




# भाजपने दिल्ली, हरियाणासह ४ राज्यांचे प्रदेशाध्यक्ष बदलले

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** आगामी काळातील राजकीय आव्हाने आणि संघटनात्मक बांधणी लक्षात घेता भाजपने एकाच वेळी चार राज्यांचे प्रदेशाध्यक्ष बदलून नवीन चेहऱ्यांना संधी दिली आहे. यामध्ये दिल्ली, हरियाणा, पंजाब आणि त्रिपुरा या राज्यांचा समावेश आहे.

दिल्लीत वीरेंद्र सचदेवा यांच्या जागी थेट केंद्रीय राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांच्याकडे दिल्ली भाजपची कमान सोपवण्यात आली आहे.

हर्ष मल्होत्रा हे भाजपचे ज्येष्ठ नेते आणि दिल्लीतील खासदार आहेत. सध्या ते केंद्र सरकारमध्ये मंत्री म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.


डॉ. अर्चना गुप्ता यांची हरियाणा भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. अर्चना गुप्ता या हरियाणातील एक आक्रमक आणि सक्रिय महिला नेत्या आहेत.

पंजाब भाजपच्या अध्यक्षपदाची धुरा केवल सिंह ढिल्लों यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. ढिल्लों हे बरनाला येथून दोनदा आमदार म्हणून निवडून आले आहेत.

ईशान्येकडील महत्त्वाचे राज्य असलेल्या त्रिपुरामध्ये अभिषेक देबरॉय यांना भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष बनवण्यात आले आहे.

# ज्येष्ठ स्त्रीरोग तज्ञ डॉ. ज्योती देशमुख यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील ज्येष्ठ आणि सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. ज्योती देशमुख यांचे गुरूवार, दि. २८ मे रोजी पहाटे ४ वाजेच्यादरम्यान नांदेड येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना निधन झाले. त्या ८३ वर्षांच्या होत्या.



डॉ. ज्योती देशमुख यांनी आयुष्यभर वैद्यकीय सेवेसोबतच शिक्षण आणि महिला सक्षमीकरणासाठीही उल्लेखनीय कार्य केले. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी नांदेड येथे महिला महाविद्यालय सुरू करण्यात पुढाकार घेतला, तसेच अर्धापूर येथे ‘मीनाक्षी देशमुख मुलींचे हायस्कूल’ स्थापन करण्यातही त्यांचे मोलाचे योगदान होते.

त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व्यवस्थापन समितीच्या सदस्य म्हणूनही कार्य केले होते. पती डॉ. डी. आर. देशमुख यांच्यासमवेत त्यांनी १९६७ पासून नांदेडच्या सामान्य रुग्णालयात वैद्यकीय सेवा बजावली. त्या मराठवाड्यातील पहिल्या महिला लेप्रोस्कॉपिसिक सर्जन होत्या. त्यांनी आपल्या सेवाकाळात विना टाकण्याच्या ४५ हजार कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करून सामाजिक आरोग्य क्षेत्रात मोठे योगदान दिले. डॉ. ज्योती देशमुख या प्रथितयश कवयित्री होत्या. त्यांचा एक कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे.

आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक कार्यातील त्यांच्या भरीव योगदानाची दखल घेत ह. भ. प. भाऊसाहेब पावडे देशमुख महाराज प्रतिष्ठान या संस्थेतर्फे त्यांना २०२५ मध्ये प्रतिष्ठेचा ‘जीवनगौरव पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.

डॉ. ज्योती देशमुख या शिवसेनेचे नांदेडचे माजी आमदार डॉ. डी. आर. देशमुख यांच्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात पती डॉ. डी. आर. देशमुख, पुत्र डॉ. सचिन देशमुख, सून डॉ. क्षमा देशमुख (सध्या ऑस्ट्रेलिया), डॉ. नचिकेत देशमुख, सून डॉ. निकिता देशमुख, दोन नातू आणि एक नात असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर आज, शुक्रवार दि. २९ मे २०२६ रोजी सायंकाळी गोवर्धन घाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# भाजपकडून विधान परिषदेसाठी पहिला उमेदवार घोषित

**मुंबई (प्रतिनिधी)–** भाजप महायुतीकडून विधान परिषदेसाठी आपला पहिला उमेदवार जाहीर करण्यात आला आहे. अमरावती विधान परिषदेसाठी भाजपकडून प्रवीण पोटे पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

विधान परिषदेच्या जागा वाटपावरून महायुतीमध्ये रस्सीखेच सुरू असल्याचं पहायला मिळत आहे. दरम्यान महायुतीमध्ये विधान परिषदेच्या जागा वाटपाच्या चर्चेचं गुऱ्हाळ सुरू असतानाच आता भाजपकडून विधान परिषदेसाठी पहिल्या उमेदवाराच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. अमरावती विधान परिषदेसाठी भाजपकडून प्रवीण पोटे पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# खेळाशिवाय शिक्षण अपूर्णच!

आजचे विद्यार्थी हे मोबाईल, व्हीडीओ गेम आणि दूरचित्रवाणी यांच्या आहारी गेले आहेत. ही पिढी हळूहळू मैदानी जीवनापासून दूर जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुन्हा मैदानाशी जोडणे ही काळाची गरज बनली आहे. कारण आजच्या स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान युगात विद्यार्थ्यांचे जीवन केवळ पुस्तकांपुरते मर्यादित राहिले आहे. गुण, परीक्षा, स्पर्धा आणि करिअर यांच्या दबावाखाली बालपण हरवत चालले आहे. अशा परिस्थितीत खेळाचे महत्त्व नव्याने अधोरेखित करण्याची गरज निर्माण झाली आहे. शिक्षण जितके आवश्यक आहे, तितकेच खेळही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अपरिहार्य आहेत. त्यामुळे शाळा आणि महाविद्यालयांमध्ये खेळांना दुय्यम नव्हे तर शिक्षणाइतकेच महत्त्व मिळाले पाहिजे. पण दुर्दैवाने तसे होत नाही. एखाद्या शिक्षकांचा अभ्यासक्रम अपूर्ण असेल तर तो पूर्ण करण्यासाठी खेळाच्या तासिकेचा बळी दिला जातो, हे सत्य नाकारता येत नाही. तसेच बहुतांश शाळांना मैदानच नाही. त्या मुलांनी खेळायचं कुठं? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे, परंतु अशा शाळांना प्रामाणिक व कर्तव्यदक्ष अधिकारी मान्यता देतात. खेळ हे केवळ मनोरंजनाचे साधन नाही, तर निरोगी शरीर आणि सुदृढ मन घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे. नियमित व्यायामामुळे शरीर तंदुरुस्त राहते, रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि भविष्यातील अनेक आजारांपासून संरक्षण मिळते. आज लहान वयातच लठ्ठपणा, मधुमेह, मानसिक ताण यांसारख्या समस्या वाढताना दिसतात. यामागे मैदानी खेळांचा अभाव हे एक मोठे कारण आहे. खेळ विद्यार्थ्यांच्या मानसिक विकासातही मोठी भूमिका बजावतात. अभ्यासाचा ताण, स्पर्धेचे दडपण आणि भविष्याची चिंता यामुळे अनेक विद्यार्थी नैराश्याकडे झुकताना दिसतात. अशा वेळी खेळ त्यांना मानसिक शांतता आणि आनंद देतात. खेळामुळे मन प्रसन्न राहते, आत्मविश्वास वाढतो आणि सकारात्मक विचार करण्याची क्षमता विकसित होते. विजय आणि पराभव या दोन्ही गोष्टी स्वीकारण्याची तयारी खेळ शिकवतात. जीवनात प्रत्येक वेळी यश मिळेलच असे नसते, हे वास्तव खेळाच्या माध्यमातून विद्यार्थी सहज आत्मसात करतात. विद्यार्थी जीवनात मैत्री, सहकार्य आणि संवादकौशल्य विकसित होणे अत्यंत महत्त्वाचे असते. संघभावना ही खेळातून शिकवली जाणारी सर्वात मोठी जीवनशिक्षणाची बाब आहे. एखादा सामना जिंकण्यासाठी सर्व खेळाडूंना एकत्रित प्रयत्न करावे लागतात. त्यामुळे परस्परांशी संवाद साधणे, जबाबदारी स्वीकारणे आणि इतरांचा सन्मान करणे या मूल्यांची जाणीव विद्यार्थ्यांना होते. आजच्या वैयक्तिक स्वार्थाच्या वातावरणात ही मूल्ये अधिक महत्त्वाची ठरतात. खेळ विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संयम आणि नेतृत्त्वगुण विकसित करतात. नियमित सराव, वेळेचे नियोजन आणि कठोर मेहनत यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडतो. मैदानावर घेतलेले निर्णय, संकटाच्या वेळी दाखवलेले धैर्य आणि संघाचे नेतृत्व करण्याची क्षमता भविष्यातील जीवनातही उपयुक्त ठरते. त्यामुळे खेळाडू विद्यार्थी अनेकदा इतरांपेक्षा अधिक आत्मविश्वासू आणि सक्षम दिसतात. विशेष म्हणजे, खेळ आणि शिक्षण हे एकमेकांचे विरोधक नसून पूरक घटक आहेत. अनेकांना वाटते की, खेळामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष होते; मात्र वास्तव त्याच्या उलट आहे. नियमित खेळणारे विद्यार्थी अधिक उत्साही, एकाग्र आणि मानसिकदृष्ट्या सक्षम असतात. त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक कामगिरीतही सुधारणा दिसून येते. आज अनेक विद्यार्थ्यांना क्रीडा शिष्यवृत्ती आणि करिअरच्या नव्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे खेळ हे केवळ छंद न राहता भविष्य घडविण्याचे साधन बनले आहे. तथापि, आज अनेक शाळांमध्ये खेळाच्या मैदानांचा अभाव, प्रशिक्षकांची कमतरता आणि शैक्षणिक गुणांवर असलेला अति भर यामुळे क्रीडा संस्कृती कमकुवत होताना दिसते. पालकांनीही केवळ गुणांच्या शर्यतीत मुलांना ढकलण्याऐवजी त्यांना खेळासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. सरकार, शैक्षणिक संस्था आणि समाज यांनी मिळून विद्यार्थ्यांसाठी निरोगी आणि खेळप्रधान वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. कारण शिक्षण आणि खेळ यांचा समतोल साधणारी पिढीच खऱ्या अर्थाने सक्षम राष्ट्र घडवू शकते. पुस्तकातील ज्ञान माणसाला बुद्धिमान बनवते, तर खेळ त्याला मजबूत, शिस्तप्रिय आणि आत्मविश्वासू बनवतात. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या जीवनात खेळाला केवळ पर्याय नव्हे, तर आवश्यक घटक म्हणून स्थान मिळाले पाहिजे. कारण खेळ थांबले, तर केवळ मैदान रिकामे होत नाही, तर बालपण आणि जीवनातील उत्साहही हरवू लागतो.

# मराठीतील शेक्सपियर राम गणेश गडकरी



रा. ग. गडकरींनी कोल्हटकरांच्या विनोदी साहित्याची समृद्ध परंपरा पुढे चालवली. ती सुरू ठेवताना नाट्यक्षेत्रातील आपली श्रेष्ठता अशा काही कल्पकतेने पुढे नेली. ती महाराष्ट्रात आणि मराठी मन्मनात रुजविली, खुलविली व फुलविली. त्यांनी आपल्या विनोदी साहित्यनिर्मितीचा प्रारंभ वयाच्या बाविसाव्या वर्षी केला. किर्लोस्कर नाट्यमंडळाच्या 'रंगभूमी' मासिकाने 'सवाईनाटकी' या वैशिष्ट्यपूर्ण नावाने त्यांना झोतात आणले. त्यांच्या प्रतिभाशक्तीचे प्रारंभिक दर्शन तेंव्हा मराठी मनाला झाले. ते पुष्कळ प्रमानात रुढीवादी असले तरी त्यांनी नाटकातील पुष्कळ परंपरावादी व यांत्रिक गोष्टींना फाटा दिला. प्रस्तावनेवर भाष्य करताना सूत्रधार व नटी यांचे साचेबद्ध संवाद आणि प्रवेश यावर टिकास्त्र सोडून त्यांच्या त्याच त्या कृतीमुळे प्रेक्षकांचा होणारा अपेक्षाभंग. तरीही नाटककार ती कालबाह्य भूमिका बदलण्यास असमर्थ असल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यामुळे त्यांच्या भूमिकेवर त्यांनी केलेले भाष्य लक्षवेधी आहे.

बोलण्याच्या भरात कोणतीही गोष्ट सहज विसरणारा अजागळ घरातील सर्व भानगडीबद्दल बेदरकार राहून, सदैव नाट्यजाहिराती ठोकणारा लोकरंजनाचा मक्तेदार, ग्रंथकार व नट यांच्याबद्दल देव व प्रेक्षकाजवळ वकिली करणारा स्वंयसेवक, सदैव एका उपवर पोरीचा दैववादी बाप, नाटकाचा तिटकारा करणाऱ्या एका हटवादी बायकोचा निश्चयी नवरा या सूत्रधाराच्या पारंपरिक कृतीत गडकऱ्यांना कोणतेच विशेषत्व दिसत नव्हते. नाटक कसे पहावे? या विषयावरील त्यांच्या लेखाला ते जाणिवपूर्वक पूर्वाध म्हणतात.रंगभूमीच्या संपादकांनी या विषया वरील आपल्या ग्रंथात फक्त उत्तरार्धावर भाष्य केले आहे.नाट्यगृहात प्रवेश केल्यावर लक्षपूर्वक नाटकात समरस होवून नाट्यकृतीचा आस्वाद कसा घ्यावा? या विषयीचे ते भाष्य होय. पण कोणताही मोबदला न देता केवळ दांडगाई करून नाट्यगृहात प्रवेश मिळविणे हा या विषयावरील पूर्वाध आहे. या दानवी वृतीने नाट्यगृहात प्रवेश मिळविणारे प्रेक्षक त्यांच्या तील कोणत्या मानवी वृतीचा विकास करतात?हा गडकऱ्यांना पडलेला प्रश्न आहे. नाट्याभिरुची असून प्रेक्षकांच्या फुकट्या प्रवृतीवर त्यांनी सडकून टिका केली. सूक्ष्मावलोकन शक्ती, कल्पकता, मार्मिकता, उत्तम विनोद बुद्धी व भाषाज्ञान याचे दर्शन त्यांच्या लेखनीतून वेळोवेळी येते.

आचार्य अत्रेंची त्यांच्यावर नितांत श्रद्धा, निष्ठा व त्यांच्याविषयी असलेला आदर त्यामुळे त्यांच्या विषयी कुणीअनुद्गार काढणे ही कल्पना ते सहन करु शकत नव्हते. ग त्र्यं माडखोलकर एकदा गडकऱ्यावर टिका करतांना म्हणाले, अरुणोदय ज्या लेखकांने कधी पाहिलेला नाही. त्यांच्या अरुणात आत्मानुभव कसा असणार? गडकऱ्यांच्या जीवनात आत्मानुभव नाही.ही कल्पनाच अत्रे सहन करु शकत नव्हते. त्याबद्दल त्यांना त्यांची जागा दाखविणे अत्रेंना महत्वाचे वाटले. माडखोलकरांना त्या अनुषंघाने सवाल करीत अत्रे म्हणाले, गडकरी उशिरा उठतं हे तुम्हाला कसे काय माहित?तुम्हाला काय त्यांचे अंथरुन गुंडाळण्यासाठी त्यांनी ठेवले होते का? आपल्या साहित्य क्षेत्रातील गुरुविषयी अशी अति उथळ टिका त्यांना पसंत पडणे शक्यच नव्हते. कोल्हटकरांना नाट्यप्रांतात जे शक्य झाले नाही.ते गडकऱ्यांनी साध्य करुन दाखविले.ते एवढ्या प्रचंड उंचीवर जाऊन शक्य करुन दाखविले की नाट्य प्रांताचे महामहीम म्हणून अभ्यासकांना त्यांच्याकडे पहावे लागेलं.विनोदनिर्मिती प्रांत कोल्हटकरांचा,तो सन्मान आपल्या गुरुवर्याचा. याचे भान गडकऱ्यांनी ठेवले.त्यावर अत्रे म्हणतात,कोल्हटकरांच्या मार्मिक विनोदाची झेप व विविधता गडकऱ्यांना आपल्या विनोदात आणता आली नाही. ह्याचे कारण कोल्हटकरांनी सामाजिक तत्वज्ञानाचा खोलवर विचार केला होता.समाजदोषाचे वास्तवविश्लेषण करण्याचे भान त्यांना असल्याने पुरोगामी भूमिकेचा सखोल विचार ते करु शकले.गडकऱ्यांचा सामाजिक विचार तुटपुंजा होता.वृत्तीने ते सनातनीच होते. त्या मुळे कोल्हटकरांनी त्यांच्या विनोदाचे जे स्वतंत्र तंत्र निर्माण केले.त्याचे पुष्कळ अनुकरण गडकऱ्यांनी केले.

स्वातंत्र्य प्राप्तीसाठी ज्याप्रमाने वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब आपापल्या विचारसरणीनुसार देश भक्तांनी केला होता त्याप्रमाणे फुकटे प्रेक्षक वाममार्गाचा अवलंब करतात. तशी उदा. गडकऱ्यांनी दाखवून दिली.गडकऱ्याच्या कल्पनाशक्तीला जहाल, मवाळ व निशस्त्र प्रतिकारवादी त्याबरोबरच प्रत्यक्षप्रतिकार करणारे अराजकवादी व दहशतवादी सुद्धा त्यांना दिसतात.मुद्दाम उशीरा पत्रे देणारा पोस्टमन किंवा नाटकगृहात मुद्दाम पाणीटंचाई निर्माण करणारा नगरपालिका पाणीपुरवठा विभागाचा नौकरवर्गाची त्यांनी निशस्त्रप्रतिकार करणाऱ्या वर्गात गणना केली आहे. त्यामुळे त्यांच्या शोधक व डोळसं विनोदबुद्धीस शॅल्यूट केला पाहिजे. प्रसंगातील सुसंगती व विसंगती शोधून त्यातून विनोद निर्मिती करण्याची त्यांची प्रतिभा प्रचंड होती.

नाटकाच्या प्रेक्षकांना नाटकांची ओढ खूप आहे. ही खूप जमेची बाजू पण कलाकारांनी घेतलेली प्रचंड मेहनत, नाटक कंपनीला नाट्यसेवा देण्यासाठी करावा लागणारा खर्च याचा विचार करणारे प्रेक्षक तुलनेने अल्प असल्यामुळे सेवा देणाऱ्यांच्या साधने वर त्याचा होणारा अनिष्ठ परिणाम हे दु:ख मांडतांना त्यांना सूचलेली विनोदनिर्मिती पहा. मोफत नाटक पहाणारे प्रेक्षक हे उत्तम अभिनेते कसे असतात?हे सौदाहरण पटवून देतांना विविध मानवीप्रवृत्तीचे स्वभावदर्शन त्यांनी खूपच रंजक शैलीने मांडले आहे.नेहमी असत्य कथन करणारा स्टेशनमास्तर, जवळ पैसा नाही,बापाने हाकलून दिले.हे रडगाणे गाऊन नाटक आयोजकाच्या पायाला घट्ट मिठी मारुन बसलाआहे.दुसरा नाटक कंपनीतील नाते- संबध सांगतो. तिसरा त्यापेक्षाही भन्नाट आहे. डार्विनच्या 'ओरिजनल ऑफ स्पिसीज'(प्रजातींची उत्पत्ती) या पुस्तकाचा आधार घेवून कंपनीत पाळलेल्या माकडाशी संबध जोडून नाट्यगृहात प्रवेश मिळवतो. या पुढचा त्यांचा अनुभव हा जबरदस्त हास्यनिर्मिती करणारा आहे. फुकट्या प्रेक्षकांची असह्य होणारी नौटंकी पाहून त्याकाळी नाटक कंपनीला चुना लावणाऱ्या वृत्ती कशा महाठग होत्या?हेआपल्या निर्दशनास येते.विद्यार्थ्यासाठी सवलतीच्या दरात नाटक लागले, हे कळताच गावगुंड, प्रौढ, म्हातारे सर्वच विद्यार्थ्यांच्या गणवेशात येवून आपण विद्यार्थी असल्याचा दावा करतात. तसा माणूस आयुष्यभर विद्यार्थीच असतो. शेवटच्या श्वासापर्यंत माणसाने स्वत:ला विद्यार्थीच सम जावे, असे आमच्या गुरूजींनी बालपणी आम्हास सांगितले होते. याचा अर्थ असा नव्हे की स्वार्थ साधण्यासाठी थोरा-मोठ्यांनी लहानपण देगा देवा...असे होवू नये. असे जर होत असेल तरी गडकऱ्यांचा कालावधी चांगला म्हणावा लागेल.आज फुकटात काही देतो म्हटले तर माणसे भाड्याने आणावे लागतात.अर्थात ही सर्व अतिशयोक्ती करुन त्यांनाही हास्यनिर्मितीच करायची होती.नाट्यगृहातून बाहेर आल्यावर नाटकाची व लेखकाची येथेच्छ निर्भत्सना करुन झाल्यावर येतांना लेखकाची भेट घेवून, छानच होते हो तुमचे नाटक, कित्ती छान,सुरेख व खरेच अप्रतिम!पुन्हा केंव्हा दुसरे नाटक दाखवणार?अशी निर्लज्ज विचारणा करणाऱ्या प्रेक्षकांना नेमकी कोणती उपमा द्यावी?असा प्रश्न गडकऱ्यांना पडायचा.

गडकऱ्यांच्या 'कवींचा कारखाना' या सव्वीस पानी विस्तृत लेखात प्रतिभेशी काही संबध नसलेल्या पण नाम वंत कवींची नक्कल करुन भरभरुनकवीतेचे पीक घेणाऱ्या उथळ कवींची त्यांनी हजेरी घेवून अतिशय परखड प्रश्न उपस्थित केले आहेत.कवितेचा उल्लेख केल्याबरोबर आपल्या दृष्टीस येणाऱ्या बाबींची यादी त्यांनी दिली आहे. कवितेच्या नावाखाली अतिशय रसहिन विषयावरील बेचव रचनेचा समाचार त्यांनी घेतला आहे, महाकवी आणि तुम च्यात अगदी अल्प अंतर आहे.महाकवी स्वर्गात भराऱ्या मारीत असतो आणि तुमच्यासाठी स्वर्ग दोनबोटे उरलेला असतो एवढेच!जीवसृष्टीतील इतर घटकाप्रमाणे कवी जन्म ावा लागतो.कविता छापून आणण्यासाठी संपादकाजवळ लाचार होणारा कवी हा कधीच सारस्वतपुत्र होऊ शकणार नाही. हे छातीठोकपणे सांगण्याचे काम गडकऱ्यांनी केले.

स्त्रीयांच्या मासिकातील पदार्थ नावे व कृतीचा संबध असतोच असे नाही.पाकक्रियेचे स्पष्टीकरण देतांना असणारी विशिष्ट भाषा यावर त्यांनी खूप चविष्ट टिका केली आहे.'दुधाचा रस्सा,' 'दह्याची भाजी', 'कांद्याच्या करंज्या','तिखटमिठाच्या मैसूर वड्या' ही स्वंयपाकघरातील विरोधाभासाची उदा. आहेत. 'भोपळ्याच्या बियाचे अनारसे' यात अद्भूत रस आहे. 'अलिजाबहादूर' या पक्वानात त्यांना वीर रस दिसतो.तर 'फजिता' हा प्रकार पाहिल्यावर त्यांना हास्यरस आठवतो. मुरक्की व सुरगी होळगी ही पात्रे इतर राज्यभाषेत येत असून हास्यरसातच मोडतात.पदार्थ नावावरुन साहित्यरसाला गवसनी घालणे त्यांना शक्य झाल्यामुळे त्यांच्या कुशाग्र बुद्धी मत्तेची व दुरदृष्टीची कल्पना येते. विडंबनाचा एक वेगळा प्रकार त्यांनी मराठी भाषेत आणला.त्यात त्यांचे भाषाप्रभुत्व व विनोदवृत्तीचा अप्रतिम संगम झालेला दिसतो.

गडकऱ्यांचा अल्पसा जीवित कालावधी. मराठी कवी, नाटककार, विनोदी लेखक असा विविधांगी साहित्यविहार त्यांनी मराठी भाषा प्रांतात केला. पण अल्प कालावधीत त्यांचा मराठीचे शेक्सपियर असा सार्थ उल्लेख साहित्यक्षेत्रातील जाणकारांना करावा लागला. गोविंदाग्रज या नावाने काव्यप्रांत तर बाळकराम नावाने लेख व कथाप्रांत त्यांनी समृद्ध केला. एकच प्याला, प्रेमसन्यास, पुण्य-प्रभाव, भावबंधन, गर्वनिर्वाण ही त्यांची अजरामर नाटके. राजसन्यास, मित्रप्रिती, वेड्यांचा बाजार.ही त्यांची अप्रकाशित नाटके. रिकामपणची कामगिरी हा बाळकरामम धील काही लेखांचा संग्रह.अन्य साहित्यात चिमुकली इसापनिती, समाजात नटाची जागा,नाट्यकलेची उत्पत्ती, कोल्हटकरांनापत्र ही साहित्यनिर्मिती. त्यांच्या अल्पायुष्यातील त्यांची साहित्यनिर्मिती मोजकी जरी असली तरी त्या साहित्याची उंची खूप महत्वाची. त्या साहित्यनिर्मितीमुळे त्यांनी मराठी साहित्यातील एवरेस्ट गाठले. मराठी साहित्यातील या शेक्सपियरला त्यांच्या १४१ व्या जयंतीनिमित्ताने विनम्र अभिवादन.

-प्रा. वसंत गिरी
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# धर्म, परंपरा व अंधश्रद्धा; काही गोष्टी लक्षात घ्याव्यात?



धर्म, परंपरा व अंधश्रद्धा या दोन गोष्टी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असं म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. धर्म हा संस्कारावर अवलंबून असतो. तशीच परंपरा व अंधश्रद्धाही संस्कारावर अवलंबून असते. संस्कार हे लहाणपणीच होत असतात. ते संस्कार कधी आईवडिलांमार्फत तर कधी शेजाऱ्यांमार्फत तर कधी मित्र-मैत्रिणींमार्फत तर कधी संस्कारी पुस्तकांचं वाचन करुन, व्हीडीओ पाहून होत असतात.

संस्कार हे टिकून राहतात. लहानपणी झालेले, कारण संस्कार हा एक विचार असतो, मनात प्रतिबिंबित झालेला. तो विचार एकदा का मनात बसला तर बदलता येत नाही. बदलविताही येत नाही, जर संस्कारात दृढतेची शक्ती असेल तर...तसं पाहिल्यास संस्कार हे माणसाच्या मनावर अवलंबून असतात. जे मन चंचल असतं व जे सतत बदलत असतं.

माणसाच्या मनात हरघडीला वेगवेगळे विचार येत असतात. म्हटलं जातं की, माणसाच्या मनात प्रत्येक क्षणाला सात प्रकारचे विचार येत असतात. म्हणजेच एकाच वेळेस माणूस वेगवेगळी सात प्रकारची कामे करीत असतो. माणूस जीवन जगत असताना सात प्रकारांनी जगत असतो. जर मन चंचल असेल तर त्याचे विचारही चंचल बनतात आणि माणसाचं मन स्थिर असेल तर माणसाचे विचारही स्थिर होत असतात. ज्यातून वाईट रुढी, परंपरा, धर्म, रिती, चालीरिती आणि अंधश्रद्धाही स्थिर होऊन जातात. जर माणसाचं मन स्थिर असेल तर त्याच्या मनातील दृढ झालेली एखादी गोष्टही, वाईट जरी असली तरी त्या वस्तुस्थितीला माणूस बदलू शकत नाही. जसे पाषाणात देव आहे. ही अंधश्रद्धा जरी असली आणि ती अंधश्रद्धा जरी वाटत असली तरी ती मन स्थिर असल्यानं बदलता येत नाही. अशा अनेक अंधश्रद्धा आहेत की, ज्या माणसाला अंधश्रद्धा आहेत हे माहीत होवूनही त्या बदलल्या जात नाहीत. त्या माणसाच्या मनात वाढतच जात असतात. असाच धर्मही आहे. धर्म देखील असाच माणसाच्या मनात एकदा शिरला की तो सहजासहजी बदलता येत नाही. अन् त्याबाबतीत कोणी परीवर्तनवादी विचार जरी सांगीतला तरी तो आपल्याला सहजासहजी स्विकारता येत नाही. कारण त्याबाबतीत आपल्या मेंदूत एक वेगळंच स्थान निर्माण झालेलं असतं.

धर्म, परपरा व अंधश्रद्धा, आपल्यातील रुढ असलेल्या रिती व चालीरिती या बदलवता येत नाही. तरीही आज आपल्याला तशा स्वरुपाचं परीवर्तन झालेले दिसत आहे. लोकांनी धर्म बदलवलेला दिसतो. अंधश्रद्धाही काही प्रमाणात बदललेल्या दिसतात. त्यातच प्रथा, परंपरा, चालीरितीही बदललेल्या दिसतात. त्याचं कारण काय असावं? त्याची अनेक कारणं आहेत, पहिलं कारण आहे, बालपणात एखाद्यावर न झालेले संस्कार. तशीच सामाजिक भीती. सामाजिक भीती याचा अर्थ अशा प्रकारचा नवीन विचार स्विकारतांना समाजाची भीती न बाळगणे. तसं माणसाचं मन हे चंचल असतंच.

कॅन्सरसारखा असाध्य आजार, एवढंच नाही तर शरीरातील कोणतेही आजार, कोणताच धर्म हा दूर करु शकत नाही. मग तशा स्वरुपाचा आजार धर्मपरीवर्तन करताच कसा दूर होतो? त्याचं कारण आहे, म ाणसाच्या मनात असलेली दृढ शक्ती. जी दृढ शक्ती धर्मपरीवर्तन करतांना इतर धर्मपरीवर्तन करणाऱ्या व्यक्तीनं भरलेली असते. त्याच आत्मविश्वासाच्या जोरावर धर्मपरीवर्तन करताच संबंधित व्यक्ती बरा झालेला असतो, जर कॅन्सर हा पहिल्या स्टेजमध्ये असेल तर... कधीकधी कोणत्याही स्वरुपाचे काही असाध्य रोग हे माणसाच्या मनातील दृढ शक्तींनी बरे होत असतात. पण हे कोणाला सांगावे?

आधीपासूनच चंचल मन असणाऱ्या व्यक्तीला सांगून काही उपयोग होत नाही. कारण तशा स्वरुपाच्या व्यक्तीला असे विचार कितीही बदडून सांगीतले तरी ते त्याच्या मनाच्या अंतर्भागापर्यंत पोहोचतच नाहीत. शिवाय जर एखादा धर्म कॅन्सरसारखा आजार दुरुस्त करीत असेल, त्या धर्मात भूतांना रोखणारी ताकत असेल तर तो धर्म घेतल्यानंतर त्या धर्मातील लोकं कधीच म रायला नकोत. ते कमीतकमी त्रिकालाबाधित अमरच व्हायला हवेत ना. हे जरी खरं असलं तरी लोकं मरतातच. मग जे धर्म कॅन्सरसारखे असाध्य अहणारे आजार दुरुस्त करीत असतात. त्याच धर्मात आपलं मरण रोखण्याची ताकद नसावी काय? असावीच. तरीही माणूस मरतोच. मग असा जर माणूस मरत असेल वा त्याला अमरत्व प्राप्त होत नसेल तर अशा व्यक्तीनं ऋर्म डदलविण्याची काय गरज आहे?

परिवर्तन ही काळाची गरज आहे. माणसानं येणाऱ्या विपरीत परिस्थितीनुसार स्वतःला बदलवायलाच हवं. जसे उन्हाळा जसजसा दिवसेंदिवस जर तप्त होत गेला, तसंतशा माणसांनी स्वतःच्या सुखासाठी सोयी आणल्या. आधी हातानं बनवलेले पंखे आणले. परंतु हात दुखत असत सतत फिरवावे लागत असल्यानं. त्यानंतर माणसानं पंखे आणले. त्यानंतर कुलर आणला व आता एसी आणला. पुढं आणखी काही येईल. तसंच प्रकाश मिळविण्यासाठी आणि अंधारावर मात करण्यासाठी आधी शेकोटी आणली. त्यानंतर कंदील आणला. वीज आणली आणि आता सौरपॅनल. असं बऱ्याच बाबतीत घडलं. कालचा ब्लॅक अँड व्हाईट टिव्ही जावून आता लोकं एल सी डी पर्यंत पोहोचले. मोबाईलमध्येही क्रांती होवून आता स्मार्टफोन आला. तसंच धर्माच्या बाबतीतही घडलंच. लोकांनी पाषाणात देव नाही. हे ठरवून काहींनी मुर्तीपुजाही सोडली. त्यातच आपल्या विचारात परीवर्तन करुन कालचा डोक्यावरचा पदर नष्ट केला व त्याजागी जीन्स व टी शर्ट आणला. डोक्यावरची टिकली, गळ्यातील मंगळसूत्र गायब केलं. हे ठीक झालं. असे बदल व्हायलाच हवेत. जे झाले. अर्थातच चांगलं असेल ते घेतलेलंच बरं. परंतु धर्मपरीवर्तन शुल्लक कारणानं करणं बरोबर नाही. ज्यातून वाद निर्माण होत असतात.

महत्वाचं सांगायचं म्हणजे लोकं धर्मपरीवर्तन करतात. करवून घेतात. हे बरोबर आहे आणि करावंच. परंतु असं धर्मपरीवर्तन करतांना लव्ह जेहाद वापरणं बरोबर नाही. अन् हं, धर्मपरीवर्तन करतांना लोकांना भीती दाखवणं बरोबर नाही आणि असं धर्मपरीवर्तन करतांना लोकांना अमूक अमूक धर्मात अमूक अमूक गोष्टी चांगल्या नाहीत. असं म्हणून धर्म परीवर्तन करुन घेवू नये. ज्यातून वाद निम ाण होतात व वादाची परियंती एकमेकांच्या हत्येत होते. हं, एखाद्या धर्मातील तत्वे त्याच धर्मातील माणसाला छळत आहेत. ती तत्वे त्याच धर्मात एकाला मित्रासारखी व एकाला शत्रूंसारखी वागणूक जर देत आहे तर असे धर्म त्यावेळेस बदलविणे ही बाब तेवढी गंभीर नाही. जसं अस्पृश्यांचं धर्मपरीवर्तन करतांना डॉ. बाबासाहेबांनी पाऊल उचललं. ना रहेगा बॉस ना बजेगी बासरी अर्थात ना तुमचा धर्म ना तुमच्या धर्मातील भेदभाव. हे जरी खरं असलं तरी सध्या जग बदललं आहे. आता धर्मपरीवर्तनाच्या बाबतीत कोणत्याच धर्मात भेदभाव नाही. कोणताच धर्म आता धर्मपरीवर्तनाच्या बाबतीत भीती दाखवत नाही. तेव्हा धर्मपरीवर्तन करतांना स्वतःला तशा स्वरुपाचं वर्णीत करु नये. हं, जर संबंधित धर्माची तत्वे चांगली जर वाटत असेल तर अभ्यास करुन तो धर्म स्विकारावा. स्वतःमध्ये त्या धर्माबाबत अंधश्रद्धा निर्माण करुन नये. जसा अमूक अमूक धर्म कॅन्सर दुरुस्त करतो. कारण जगात असे कोणतेच धर्म नाहीत की जे असाध्य आजार दूर करु शकतील. तसेच लव्ह जिहादच्या नावावर तर अजिबात धर्म परीवर्तन करु नये. त्यावेळेस संभाजी महाराजांचे बलिदान वा गोव्यातील हातकातरी खांब लक्षात घ्यावे. तसंच धर्म बदल केला तरी चालेल, परंतु धर्माच्या नावावर कोणीही समाजात सामाजिक तेढ निर्माण करुन एकमेकांची कत्तल करु नये. जेणेकरुन देशात राहणाऱ्या आपल्याच नातेवाईकांची कत्तल होईल व आपलाच कोणीतरी एखादा वंशज मारला जाईल. हेच रुढी, परंपरा, चालीरिती व अंधश्रद्धेच्या बाबतीतही घडावं म्हणजे झालं.

-अंकुश शिंगाडे
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# चायनिज पदार्थ आरोग्यासाठी हानिकारकच

भारतीयांना चायनीज गोष्टीचे पूर्वीपासूनच आकर्षण आहे. अगदी चिनी वस्तूंपासून चायनिज पदार्थांपर्यंत सर्वच गोष्टी भारतीयांना आवडतात. त्यातही चायनिज पदार्थांची तर सर्वांना चटक लागलेली आहे. बाहेर जेवायला जायचे म्हटले तर बरेच जण चायनिज पदार्थांचाच बेत करतात. मात्र भारतात आणि चीनम ध्ये मिळणाऱ्या पदार्थात खूप फरक आहे.

भारतात चायनिज पदार्थांच्या नावाखाली जिभेला पूरक ठरतील असे चवीचे पदार्थ तयार केले जातात. रस्त्याशेजारी, फुटपाथवर, गल्लीबोळात स्वस्त आणि सहज मिळणारे गडावरील चायनिज पदार्थ खाण्याकडे सर्वांचा कल असते त्यातही या गाड्यांवर तरुणाईच अधिक दिसते. चायनिज गाड्यांवर तरुणाईची झुंबड उडाल्याचे दिसते. ग्रुपम धील कोणा मित्राचा वाढदिवस असेल तर तो साजरा करण्यासाठी तरुणाई चायनिज



गाड्यावरच जातात.

हॉटेल आणि रेस्टॉरंटच्या तुलनेत येथे स्वस्तात पदार्थ मिळतात हे त्या म ागचे मुख्य कारण आहे. मात्र हे पदार्थ स्वस्तात देण्यासाठी तेथील आचारयाना अनेक तडजोडी कराव्या लागतात. त्यात निकृष्ट प्रकारच्या पदार्थांच्या भाज्या आणि तेल वापरले जाते. चायनिज पदार्थांमध्ये अजिनिमोटो हा पदार्थ वापरला जातो. पदार्थांना चव आणण्यासाठी या पदार्थांचा वापर केला जातो. आवश्यकतेपेक्षा जास्त अजिनिमोटो हा पदार्थ वापरला गेला तर त्याचा परिणाम पचनसंस्थेवर होऊ शकतो.

चायनिज पदार्थांमध्ये मोनोसोडियम ग्लुटामेट, शेजवान सॉस, कृत्रिम रंग, स्टार्च कॉर्न यासारखे जिन्नस वापरल्यामुळे पचन संस्था बिघडू शकते. भात बांबूचे मूळ, मशरूम, नूडल्स, चिकन, मांस अर्धवट शिजवले जातात त्यामुळे ते पचायला जड जातात चांगल्या प्रतीचा मैदा नसल्यास तो आतड्यास चिकटू शकतो. चायनिज पदार्थांमध्ये वापरला जाणारा तांदूळही पॉलिश आणि रिफाईंड असल्याने पचन संस्थेसाठी हितकारक नसतो. त्यामुळे चायनिज पदार्थांचे सेवन आरोग्यासाठी हानिकारकच आहे. एखाद्यावेळी चायनिज पदार्थ खाल्ल्याने ते ही चांगल्या हॉटेल किंवा रेस्टॉरंट मध्ये जाऊन तर बिघडत नाही. पण आठवड्यातून चार पाच वेळा चायनिज पदार्थ खाण्याची सवय हानिकारक ठरू शकते.

-श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# नांदेड जिल्ह्यात संघटन सृजन अभियान निवडीत अन्याय झाल्याची बालाजी चव्हाण आणि केदार साळुंकेची थेट राष्ट्रीय अध्यक्षांकडे तक्रार



**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्ह्यामध्ये संघटन सृजन अभियान मोठा गाजावाजा करीत राबविण्यात आले. मात्र निवड करत असताना केवळ खांदेपालटच करण्यात आल्याची तक्रार काँग्रेसचे कार्यकर्ते केदार पाटील साळुंके व बालाजी चव्हाण यांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्याकडे एका निवेदनान्वये केली आहे.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खर्गे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, खा. प्रा. रविंद्र चव्हाण यांनी दिल्ली दरबारी वजन वापरून सर्वच निवडी करून घेतल्या आहेत. नांदेडच्या शहर अध्यक्ष पदासाठी बालाजी चव्हाण तर नांदेड दक्षिणसाठी केदार पाटील साळुंके हे प्रबळ दावेदार होते. लोकप्रतिनिधींच्या मनमानीमुळे आपणांस डावलण्यात आले आहे. या प्रकारामुळे उभयतांनी दिल्ली गाठत राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची भेट घेऊन आपल्यावर निवड प्रक्रियेत अन्याय झाला असून, त्यांनी न्याय देण्याची मागणी केली आहे. यावर काय निर्णय होतो हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

काँग्रेसच्या नांदेड दक्षिण व उत्तर जिल्हाध्यक्षसह शहर अध्यक्ष निवडण्यासाठी जिल्ह्यात अखिल भारतीय काँग्रेसकडून संघटन सृजन अभियान राबवण्यात आले. पक्षनिरीक्षक तेलंगणाचे नेते हरकरा वेणूगोपालराव यांनी नांदेड जिल्ह्यात नऊ दिवस मुक्काम करून प्रत्येक विधानसभा क्षेत्रातील कार्यकर्त्यांची मते जाणून घेतली व अहवाल तयार करीत ही प्रक्रिया पारदर्शक असून, यात लोकप्रतिनिधींसह कोणाचाच हस्तक्षेप चालणार नसल्याचा विश्वास दिला होता. त्यात निवडी होण्यासाठी इच्छुक असलेल्या अनेक नावाची चाचपणी करून त्यास प्राधान्यक्रम दिला आणि आपला अहवाल अखिल भारतीय काँग्रेसकडे सुपूर्द केला. त्यात नांदेड दक्षिण अध्यक्षपदासाठी केदार पाटील साळुंके यांचे नाव शिफारशीत गेलेले असताना त्यांची निवड झाली नाही. तसेच नांदेड शहर जिल्हाध्यक्ष पदासाठी अब्दुल सत्तार यांच्या जागी त्यांचाच मुलगा अब्दुल गफर यांची निवड करण्यात आली असून, हे अन्यायकारक असल्याचे केदार पाटील साळुंके व बालाजी चव्हाण यांनी खर्गे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# सिडको-हडको परिसरातील मुख्य मार्गावरील स्ट्रीट लाईट सुरू

## नगरसेवकांच्या पाठपुराव्याला यश



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –सिडको, हडको परिसरातील मुख्य मार्गावर गेल्या अनेक वर्षांपासून अंधाराच्या साम्राज्यात असलेल्या परिसराने अखेर मोकळा श्वास घेतला आहे. या भागातील मुख्य रस्त्यांवरील बंद असलेले पथदिवे (स्ट्रीट लाईट्स) अखेर सुरू झाले असून, यामुळे संपूर्ण परिसर प्रकाशाने उजळून निघाला आहे. अनेक वर्षांची ही समस्या मार्गी लागल्यामुळे विविध प्रतिष्ठानचे व्यापारी, नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. मनपा प्रशासन आणि प्रभाग क्रमांक २० मधील नगरसेवक यांनी पुढाकार घेऊन स्ट्रीट लाईट चालू केल्याने समाधान व्यक्त केले आहे.

सिडको, हडको परिसराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवण्यासाठी या भागातील भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, मंगला गजानन देशमुख, सौ. निरंजना राजू लांडगे आणि सौ. सुवर्णा सतीश बसवदे यांनी दाखविलेल्या एकजुटीमुळेच हा प्रलंबित असलेला स्ट्रीट लाईट प्रश्न सतत केलेल्या पाठपुराव्यामुळे निकाली निघाला आहे.

सिडको - हडको परिसरातील मुख्य रस्त्यांवर रात्रीच्या वेळी अंधार असल्याने वाहनधारकांना आणि पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला होता. मात्र, पाचही लोकप्रतिनिधींनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे महानगरपालिकेने या रस्त्यांवर नवे आणि पथदिवे कार्यान्वित केले आहेत. रात्रीच्या वेळी रस्ते उजळून निघाल्याने या भागाचे रूपच बदलून गेले आहे.

केवळ पथदिवेच नव्हे, तर या पाचही नगरसेवकांच्या एकत्र येण्यामुळे सिडको, हडको परिसरातील इतरही अनेक रखडलेली विकासकामे आता जलद गतीने मार्गी लागणार असल्याचे चित्र आहे. पाणी, रस्ते, आणि सांडपाण्याची व्यवस्था यांसारख्या मोठ्या प्रकल्पांवरही या लोकप्रतिनिधींनी लक्ष केंद्रित केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते संभाजी चौक, राज चौक, क्रांती चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अण्णाभाऊ साठे पुतळा मार्ग, ज्ञानेश्वर मार्ग, डॉ. ढगे, गोविंद गार्डन या मुख्य मार्गावर हे स्ट्रीट लाईट चालू झाल्याने या भागातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# मागासवर्गीय मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरु; अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत सहायक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड या कार्यालयाच्या अधिनस्त मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहांमध्ये सन-२०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृहे यशवंतनगर नांदेड, बिलोली, धर्माबाद, मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह रायगडनगर नांदेड, मुखेड, देगलूर, गुणवंत मुलांचे शासकीय वसतिगृह धनगरवाडी नांदेड, १२५ मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह नांदेड, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह अर्धापूर, नायगांव व मागासवर्गीय मुला-मुलींचे शासकीय वसतिगृहे भोकर, हदगांव, उमरी असे एकूण-१६ शासकीय वसतिगृहांमध्ये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी मोफत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे.

तसेच गरजू व पात्र विद्यार्थी-विद्यार्थिनींनी https://hmas.mahait.org या संकेत-स्थळाव्दारे ऑनलाईन अर्ज करावे, असे आवाहन सहायक आयुक्त, शिवानंद मिनगीर व विशेष सामाज कल्याण अधिकारी, गजानन नरवाडे यांनी केले आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करावयाचा ३० जून २०२६ पासून शालेय विद्यार्थी- ७ वी पास विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रिया अंतिम अर्ज करावयाचा दि. ७ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करता येणार आहेत आणि इयत्ता ११ वी तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी ३१ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करता येणार आहेत.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग तसेच इतर प्रवर्गातील इयत्ता आठवी, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय आणि व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रिक्त जागांवर गुणवत्तेनुसार विनामूल्य प्रवेश ऑनलाइन पद्धतीने देण्यात येणार आहे.

# खून, जबरी चोरी, चोरीमधील फरार आरोपी एलसीबीच्या जाळ्यात



**नांदेड (प्रतिनिधी)**– मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यात जबरी चोरी, चोरी, खून असे गंभीर गुन्हे दाखल असलेला व पोलिसांना पाहिजे असलेला अट्टल गुन्हेगार शेख गौस शेख माजीद याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कामठा परिसरातून गुरुवार, दि. २८ मे रोजी अटक केली. त्याच्याकडून दोन मोबाईल आणि एक दुचाकी जप्त केली आहे. मुद्देमालासह त्याला विमानतळ पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सुरू केलेल्या सर्च ऑपरेशननुसार जिल्हाभरात पोलिसांच्या गुन्हेगारांविरुद्ध कारवाया सुरू आहेत. पाहिजे व फरार असलेल्या आरोपींच्या मुसक्या आवळत त्यांना जेलची हवा चाखावयास भाग पाडले जात आहे. यातील काही सराईत गुन्हेगार पोलिसांना चकमा देत फरार आहेत. असाच एक आरोपी खून प्रकरणात व मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात पाहिजे असलेला कामठा तालुका नांदेड येथील शे. गौस शेख माजिद याला स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांच्या पथकाने अटक केली.

आरोपीकडून दोन मोबाईल आणि एक दुचाकी जप्त केली आहे. त्याची कसून चौकशी केली असता त्याने छत्रपती संभाजीनगर एमआयडीसी वाळूज येथे एक घरफोडी, विमानतळ ठाण्याच्या हद्दीत दोन, उस्माननगर ठाण्याच्या हद्दीत एक, हिंगोली जिल्ह्यातील एक, कुरुंदा, औंढा, परभणी जिल्ह्यातील हट्टा एक असे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. विशेष म्हणजे त्याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हाही दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. मिलिंद सोनकांबळे यांनी दुचाकी व मोबाईल आणि आरोपी शेख गौस याला विमानतळ पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

# 'मलाबार गोल्ड अँड डायमंड्स'ने महाराष्ट्रात जाहीर केला 'अधिक मास सिल्व्हर ऑफर'

**नांदेड (प्रतिनिधी)**– जगातील आघाडीचे ज्वेलरी रिटेलर आणि विश्वास व जबाबदारीचे प्रतीक असलेले मलाबार गोल्ड अँड डायमंड्स यांनी महाराष्ट्रातील निवडक शोरूममध्ये 'अधिक मास' या शुभ कालखंडानिमित्त खास मोहिमेची घोषणा केली आहे. या मोहिमेत अध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व साजरे केले जाणार आहे.

ही खास मोहीम १७ मे ते १५ जून २०२६ दरम्यान महाराष्ट्रातील २३ निवडक मलाबार गोल्ड अँड डायमंड्स शोरूम्समध्ये उपलब्ध असेल. 'अधिक मास ऑफर' अंतर्गत ग्राहकांना सर्व सिल्व्हर वस्तूंवर मेकिंग चार्जेसमध्ये सरळ ३०% सूट मिळणार आहे.

महाराष्ट्राच्या परंपरांमध्ये खोलवर रुजलेला 'अधिक मास' हा अध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाचा कालखंड मानला जातो. या काळात चांदीची खरेदी शुभ मानली जाते आणि ती भक्ती, समृद्धी व सकारात्मक सुरुवातीशी जोडलेली असते. या सांस्कृतिक भावनांचे प्रतिबिंब दाखवत मलाबार गोल्ड अँड डायमंड्सने भक्ती तसेच भेटवस्तूंसाठी खास तयार केलेले विविध सिल्व्हर कलेक्शन सादर केले आहे.

या कलेक्शनमध्ये चांदीचे देवप्रतिमा, पूजाविधीतील साहित्य, सिल्व्हरवेअर, पैंजण, पायातले रिंग्स, जोडवी तसेच आधुनिक आणि पारंपरिक अशा विविध सिल्व्हर डिझाइन्सचा समावेश आहे. हे सर्व उत्सव, अध्यात्मिक प्रसंग आणि दैनंदिन वापरासाठी खास तयार केले आहे.

# गोदा ते सिना दिंडी रथयात्रा रवाना



**लोहा (प्रतिनिधी)** –येळकोट येळकोट जय मल्हार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा विजय असो, अशा गगनभेदी घोषणा देत श्रीक्षेत्र माळेगाव यात्रा येथून श्री खंडेरायाचे दर्शन घेऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त दिंडी रथयात्रा मोठ्या उत्साहात व भक्ती भावाने रवाना झाली.

गेल्या १२ वर्षांपासून दिंडी चालक तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संभाजीराव धुळगंडे महाराज व कार्याध्यक्ष प्रा. डॉ. नरहरी कुंभारगावे यांच्या संकल्पनेतून लोककल्याणकारी राज्य करणाऱ्या राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची माहिती व इतिहास सर्व जनतेला तसेच नव्या पिढीला व्हावा म्हणून श्रीक्षेत्र माळेगाव यात्रा ते चौंडी दिंडी रथयात्रा विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन काढण्यात येते. आता त्यात यावर्षी थोडा बदल करून पवित्र गोदावरी नदी ते पवित्र सिना नदी अशी दिंडी रथयात्रा काढण्यात आली.

# लोकशाही बळकट करण्यासाठी मतदार मॅपिंग आवश्यक –श्रावण पाटील भिलवंडे



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – नायगाव विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक पात्र मतदाराने आपले मतदार मॅपिंग ३० मे २०२६ पूर्वी तत्काळ पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते श्रावण पाटील भिलवंडे यांनी केले आहे.

निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार सुरू असलेली ही प्रक्रिया मतदार याद्या अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्यासाठी महत्त्वाची मानली जात आहे. भविष्यात मतदानाच्या दिवशी कोणालाही अडचणी येऊ नयेत, तसेच एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी मॅपिंग आवश्यक असल्याचे श्रावण पाटील भिलवंडे यांनी सांगितले.

सध्या नायगाव विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये मतदार मॅपिंगचे काम मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी प्रक्रियेबाबत अपुरी माहिती, मोबाईल क्रमांक लिंक नसणे, ओटीपी पडताळणीतील अडचणी तसेच तांत्रिक कारणांमुळे प्रक्रिया रखडत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी वेळ न लावता आपल्या मोबाईलद्वारे किंवा संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने मॅपिंग करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# एनएसबी महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती येथील अभिनव भारत शिक्षण संस्था संचालित नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. बी. फड, माजी प्रभारी प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार कुलकर्णी, उप प्राचार्य डॉ. कल्पना कदम, डॉ. किशोर इंगळे, डॉ. शशिकांत दरगु डॉ. पंकज यादव, कार्यालयीन कर्मचारी संतोष परळीकर, आनंदा सूर्यवंशी, संजय कालवणे तसेच इतर महाविद्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी क्रांतिकारक, समाजसुधारक वि. दा. सावरकरयांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, क्रांतिवीर सावरकर यांनी 'अभिनव भारत' संघटनेची स्थापना करून सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार केला आणि अंदमानच्या सेल्युलर जेलमध्ये १४ वर्षांची अत्यंत कठोर शिक्षा भोगली. सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी महाराष्ट्रातील नाशिक जवळील भगूर गावात झाला होता.

यावेळी उपस्थितांनी सावरकर यांच्या प्रतिमेची पूजा करून अभिवादन केले.

# ग्रामीण रुग्णालय भोकर येथे 'जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिन' साजरा




**भोकर (प्रतिनिधी)** –मासिक पाळी ही एक नैसर्गिक जैविक प्रक्रिया असून, ती कलंक किंवा भेदभावाचे कारन ठरू नये, असा संदेश देत गुरुवार, दि. २८ मे २०२६ रोजी ग्रामीण रुग्णालय भोकर येथे 'जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिन' साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके आणि निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे यांच्या सूचनेनुसार, तसेच ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. आरोग्य निरीक्षक सत्यजीत टिप्रेसवार आणि इन्चार्ज सिस्टर उज्वला पवार यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

'Together for a Period Friendly India' ही संकल्पना दरवर्षी २८ मे रोजी जगभरात मासिक पाळीबाबत जनजागृती केली जाते. यावर्षी 'Together for a Period Friendly India' (मासिक पाळी अनुकूल भारतासाठी एकत्रित प्रयत्न) ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून हा उपक्रम राबविण्यात आला. विशेषतः किशोरवयीन मुलींमध्ये मासिक पाळी व्यवस्थापनाबाबत ($MHM^2$) वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे आणि स्वच्छता पद्धतींचा प्रसार करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना मार्गदर्शन करताना आरकेएसके समुपदेशक सुरेश डुम्मलवाड, आरोग्य सेविका सरस्वती दिवटे आणि संगीता पंदीलवाड यांनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. ते म्हणाले, संसर्ग आणि आजार टाळण्यासाठी, शरीराचे आरोग्य जपण्यासाठी आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी स्वच्छतेची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. यामध्ये सॅनिटरी पॅडचा योग्य वापर, ठराविक काळाने पॅड बदलणे, हात स्वच्छ धुणे आणि सकस आहाराचे सेवन करणे या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. मासिक पाळीबाबतची लाज सोडून त्याबद्दल खुल्या मनाने चर्चा करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमाला वैद्यकीय अधिकारी डॉ. अनंत चव्हाण, अधिपषक्षचारिका साधना भगत, प्रज्ञा धुळे, आरोग्य कर्मचारी नामदेव कंधारे, कक्ष सेविका ज्योती काळे, सुरक्षा रक्षक बाळू पेंडलेवाड यांच्यासह ग्रामीण रुणालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

हा केवळ एक दिवस नसून महिलांच्या आरोग्य, सन्मान आणि जागरूकतेचा संदेश देणारा उपक्रम आहे. चला, या दिवशी आपण मासिक पाळीबाबतचे गैरसमज दूर करून स्वच्छतेचा संकल्प करूया, अशा शब्दांत उपस्थितांनी या दिनाचे महत्त्व विशद केले.

# दाभड येथे १७ वा सामूहिक मंगल परिणय सोहळा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)** –शांतीदूत प्रतिष्ठान नांदेडच्या वतीने १७ वा सामूहिक मंगल परिणय सोहळा बुधवार, दि. २७ मे रोजी महाविहार बावरीनगर दाभड नांदेड येथे संपन्न झाला. या सोहळ्यात ११ जोडपे परिणयबद्ध झाले.

यावेळी पू. भ. भिक्खू अतुरलीय रतन महाथेरो तथा माजी खासदार श्रीलंका यांच्या हस्ते व भंते रेवत बोधी, भंते बुद्धभूषण, भंते पट्टीसेन यांची प्रमुख उपस्थिती होती. महाउपासक डॉ. एस. पी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सोहळ्याचे उद्घाटन दीप प्रज्वलीत करून भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात अले. वधू-वरांचे पालकत्व म्हणून जी. जी. कोलते व उपासक डी. पी. गायकवाड यांनी सपत्नीक अभिवादन केले.

या सोहळ्यात ऋणानुबंध म्हणून प्रमुख अतिथी जी. बी. सोनकांबळे, रमेश दुधमल, संभाजी शेळके, हौसाजी वारघडे, प्रा. डॉ. निलेश कांबळे, एस. एन. सोनकांबळे, जी. एस. गायकवाड, डॉ. विजय माहुरे, नागराज कांबळे, हिरामण वाघमारे, दामोदर सरकटे, गणपत गायकवाड, सा. ना. भालेराव, गंगाधर गायकवाड, प्रेमदास घुले आदींचा स्वागताध्यक्ष एस. टी. पंडित यांनी शाल व पुष्पहार देऊन सत्कार केला.

सचिव डी. पी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. या सोहळ्याचे सूत्रसंचालन सुभाष काटकांबळे यांनी केले तर आभार अशोक गोडबोले यांनी मानले. सोहळा यशस्वीतेसाठी भंते बुद्धभूषण, गंगाधरराव सूर्यवंशी, प्रा. बी. एम. वाघमारे, इंजि. संजीवन गायकवाड, एस. टी. पंडित, अशोक गोडबोले, प्रा. डॉ. पंडित सोनाळे, डी. डी. भालेराव, राम गोधने, शुद्धोधन जोंधळे, जी. जी. कोलते, एम. पी. गायकवाड, सुरेश व्यवहारे, जनार्दन जमदाडे, भगवान गायकवाड, नागेश गायकवाड, सिद्धू शेळके, निलेश जोंधळे, राजू कदम, गौतम साबणे, प्रशिक गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

# अंतर्मन

मलमासात (अधिकमास) येणाऱ्या एकादशी अत्यंत पुण्यवान मानल्या जातात. अधिक मासाच्या कृष्ण पक्षात येणाऱ्या एकादशीला परमा एकादशी म्हणतात. दर तीन वर्षांनी एकदा येत असल्यामुळे परमा एकादशीला इतर एकादशींपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त होते. ही कमला एकादशी म्हणूनही ओळखली जाते. या शुभ दिवशी सांगितलेल्या विधींचे पालन करून उपवास आणि भगवान विष्णूची पूजा केल्याने पापांचे क्षालन होते, असा विश्वास आहे. परमा एकादशी केव्हा येईल आणि पूजेसाठी शुभ वेळ कोणती आहे, जाणून घेऊ...

## अधिकमासातील परमा एकादशी

### अचूक तारीख, शुभ वेळ अन् पूजेची पद्धत...

वैदिक पंचांगानुसार, एकादशीची तारीख बुधवार, १० जून रोजी मध्यरात्री १२:५८ वाजता सुरू होईल आणि गुरुवार, ११ जून रोजी रात्री १०:३७ वाजता संपेल. त्यामुळे, ११ जून २०२६ रोजी परमा एकादशीचा उपवास पाळला जाईल. उपवास दुसऱ्या दिवशी, १२ जून रोजी सोडला जाईल. यासाठी शुभ मुहूर्त सकाळी ५:२३ ते सकाळी ८:१० पर्यंत असेल.

#### परमा एकादशीचे महत्त्व

दरवर्षी २४ एकादशी असतात, परंतु अधिक मासामुळे त्यांची संख्या २६ पर्यंत वाढते. या दोन अतिरिक्त एकादशींपैकी एक परमा एकादशी असते. पुराणांमध्ये, परमा एकादशी दुर्मिळ सिद्धी प्रदान करते, असे मानले जाते. या दिवशी भगवान हरीची पूजा केल्याने दारिद्र्य दूर होते आणि वैकुंठ धाम प्राप्ती होते. असे मानले जाते की या दिवशी केवळ उपवास केल्याने आणि कथा ऐकल्याने १०० यज्ञ केल्यासारखेच फळ मिळते.

#### शुभ मुहूर्तावर सोडा उपवास

परमा एकादशीच्या दिवशी सकाळी लवकर उठा, स्नान करा आणि स्वच्छ वस्त्रे परिधान करा. यानंतर, भगवान विष्णूसमोर उपवास करण्याची प्रतिज्ञा घ्या. भगवान विष्णू आणि देवी लक्ष्मी यांना पंचामृताने स्नान घाला. आता भगवानांना पिवळी फुले, धूप, दिवा आणि नैवेद्य अर्पण करा. नैवेद्य अर्पण करताना, त्यात तुळशीचे पान नक्की ठेवा. यानंतर, भगवानांची आरती करा आणि विष्णू सहस्त्रनामाचे पठण करा. पूजेदरम्यान परम एकादशी व्रताची कथा वाचा किंवा ऐका. दुसऱ्या दिवशी शुभ मुहूर्तावर उपवास सोडा.

## स्वप्नात बजरंगबली दिसले तर ताबडतोब करा हे काम... तुमचे जीवन आनंदाने भरून जाईल!




**स्वप्नात बजरंगबली दिसले तर मन आनंदीत होते. मात्र भगवान हनुमान कोणत्या अवस्थेत दिसतात, याकडे लक्ष देणेदेखील खूप महत्त्वाचे आहे. कारण, स्वप्नशास्त्रानुसार, स्वप्ने आपल्याला सहज येत नाहीत; त्यांचा वास्तविक जीवनाशी निश्चितच काहीतरी संबंध असतो. स्वप्नात बजरंगबली दिसण्याचा अर्थ आणि असे स्वप्न पडल्यास काय करावे, हे आपण सविस्तरपणे जाणून घेऊया...**

स्वप्ने ही ज्योतिषीय ग्रह आणि भविष्यातील घटनांशी संबंधित असतात. बऱ्याचदा, आपण ज्या गोष्टींचा सर्वाधिक विचार करतो, त्यांच्याशी संबंधित स्वप्ने आपल्याला पडतात. त्याचबरोबर, काही स्वप्ने आपल्याला वास्तविक जीवनाबद्दल संकेत देतात. जर स्वतः भगवान हनुमान तुम्हाला स्वप्नात दिसले, तर तुम्ही निश्चितपणे त्यावर उपाययोजना केली पाहिजे. तथापि, असे करण्यापूर्वी, भगवान हनुमान तुम्हाला ज्या रूपात आणि मुद्रेत दिसले, त्याकडे लक्ष द्या. स्वप्नांचा अर्थ समजून घेण्यासाठी हे घटक महत्त्वपूर्ण आहेत.

- स्वप्नात हनुमान दिसण्याचा अर्थ काय? : स्वप्नात हनुमान दिसणे हे एक अत्यंत शुभ चिन्ह मानले जाते. याचा अर्थ असा की, तुमच्यासमोर अशी परिस्थिती येऊ शकते, जिथे तुम्हाला धैर्याने आणि शौर्याने पुढे जाण्याची आवश्यकता असेल. याचा अर्थ असाही होतो की तुमचा मंगळ ग्रह बलवान होत आहे. स्वप्नात हनुमान दिसणे हे आत्मविश्वासात वाढ होण्याचेही संकेत देते.
- हनुमानाला आनंदी मुद्रेत पाहणे : जर तुम्हाला स्वप्नात भगवान हनुमान आनंदी मुद्रेत दिसले, तर हे एक अत्यंत शुभ चिन्ह असू शकते. असे मानले जाते की स्वप्नात बजरंगबलीला आनंदी मुद्रेत पाहणे म्हणजे तुमच्या जीवनात सकारात्मक बदल घडू शकतात. बजरंगबलीला सकारात्मक वृत्तीने आणि सकारात्मक मूडमध्ये पाहणे हे संपत्तीसाठी देखील एक चांगले चिन्ह आहे, कारण हनुमानजींना मंगळ ग्रहाचे देवदेखील मानले जाते. त्यामुळे, हे स्वप्न मंगळ ग्रहाशी संबंधित गोष्टींसाठी, जसे की भावंडे, कुटुंब, संपत्ती इत्यादींसाठी शुभ मानले जाते.
- हनुमानाला रागावलेल्या मुद्रेत पाहणे : असे मानले जाते की जर स्वप्नात हनुमानजी रागावलेल्या मुद्रेत दिसले, तर हे स्वप्न मालमत्तेशी संबंधित वादाचे संकेत देऊ शकते. अशा परिस्थितीत अधिक सावधगिरी बाळगली पाहिजे, कारण हे कौटुंबिक वाद किंवा आत्मविश्वासाच्या कमतरतेचे लक्षण मानले जाते. याशिवाय, असे स्वप्न आरोग्याच्या समस्यांची शक्यता देखील दर्शवते. म्हणून, जर तुम्हाला स्वप्नात हनुमानजी क्रोधित दिसले, तर तुम्ही सकाळी उठून विहित विधींनुसार त्यांची पूजा करावी. मंगळवारी सकाळी लवकर उठा, स्नान करा आणि नंतर हनुमानजींना मोगऱ्याचे तेल व लाल कुंकू लावा. या उपायाने सर्व अडथळे दूर होतात आणि भगवान हनुमानाचा आशीर्वाद प्राप्त होतो.
- हनुमान मंदिराला वारंवार भेट देणे : जर तुम्हाला वारंवार हनुमानजी मंदिराचे किंवा स्वतः हनुमानजींची पूजा करत असल्याचे स्वप्न पडत असेल, तर याचा अर्थ असा होऊ शकतो की तुमचे ग्रह तुम्हाला काहीतरी संकेत देत आहेत. हे स्वप्न तुमची कृती आणि कर्तव्ये सुधारण्यासाठी एक संकेत मानले जाते. शिवाय, जर तुमचा आत्मविश्वास कमी झाला असेल, तर तो आणखी वाढवा. हे स्वप्न सूचित करते की देवाचा आशीर्वाद तुमच्यावर आहे.
- वारंवार हनुमानजींचे स्वप्न पडत असेल तर... : जर तुम्हाला तुमच्या स्वप्नात वारंवार हनुमानजी दिसत असतील, तर तुम्ही विहित विधींनुसार त्यांची पूजा करावी. याव्यतिरिक्त, तुम्ही बजरंगबलीला प्रसाद अर्पण करावा आणि दररोज त्यांच्या मंदिराला भेट देण्यास सुरुवात करावी. सलग ४० दिवस हनुमानजींच्या मंदिराला भेट देणे अत्यंत शुभ मानले जाते. जर हे शक्य नसेल, तर प्रत्येक मंगळवारी हनुमानजींच्या मंदिराला भेट द्या आणि त्यांना लाडू अर्पण करा.

## ईश्वर एक, रूप अनेक संकटकाळात इष्टदेव कसे करतात भक्तांचे रक्षण?

**तुम्ही भगवान राम, भगवान शिव यांना मानत असाल किंवा काली मातेची पूजा करत असाल... किंवा इतर कोणत्याही देवतेची उपासना करत असाल, पण तुम्ही कोणाचीही उपासना पूर्ण भक्तीने करा. जेणेकरून इष्टदेवाच्या रूपात असलेली त्या देवतेची शक्ती कल्याण घडवून आणू शकेल. जेव्हा आपण कोणत्याही संकटात सापडतो किंवा आपल्याला त्रास होतो, तेव्हा आपण देवाला प्रार्थना करतो. हीच अढळ श्रद्धा आपल्याला ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव करून देते आणि खात्री देते. ईश्वर ही ती दिव्य शक्ती आहे जी संपूर्ण जगाला आधार देते.**



वेदांनुसार, परमपिता परमात्मा म्हणजेच सर्वांचा पालनकर्ता एकच आहे, परंतु त्याची अनेक रूपे आहेत. काही ठिकाणी देवाला राम म्हणून ओळखले जाते, काही ठिकाणी कृष्ण म्हणून त्याची पूजा केली जाते, काही ठिकाणी त्याला भगवान शिव म्हणून पूजले जाते आणि इतर ठिकाणी त्याची दिव्य शक्ती काली, दुर्गा आणि सरस्वती या रूपांमध्ये अस्तित्वात आहे. ईश्वर निराकार आहे; आपण त्याला पाहू शकत नाही, परंतु आपण त्याला अनुभवू शकतो.

दृष्टिकोनातील फरकांमुळे, मानव देवाला वेगवेगळ्या नावांनी संबोधतो आणि त्याला अनेक रूपांमध्ये पाहून त्याची पूजा करतो. जसे एकच व्यक्ती असूनही, विविध नात्यांमुळे कुटुंबातील सदस्य त्याला वडील, भाऊ, काका, मामा, काका, आजोबा, मेहुणा, भाचा, मुलगा, भाचा, नातू इत्यादी नावांनी संबोधतात, त्याचप्रमाणे, वेगवेगळ्या कर्तेपणामुळे देवालाही अनेक नावे आहेत. ज्याप्रमाणे त्याच्या सृष्टिकर्त्याच्या रूपाला ब्रह्म, ज्या रूपात तो सर्वव्यापी आहे किंवा विश्वाला आधार देतो ते रूप विष्णू, ज्या रूपात तो ज्ञान प्रदान करतो ते रूप सरस्वती आणि ज्या रूपात तो सर्व संपत्ती आणि समृद्धीचा स्वामी आहे ते रूप लक्ष्मी आहे. त्याचप्रमाणे देव ही चेतनेची शक्ती आहे जी विश्वाच्या आत आणि बाहेर सर्वत्र व्यापलेली आहे. नियंत्रक असूनही, तो अदृश्य आहे कारण तो सर्वव्यापी, सर्वशक्तिमान नियंत्रक आहे. ज्योतिषशास्त्राच्या माध्यमातून, कुंडलीतील ग्रह आणि नक्षत्रांच्या आधारे निसर्गाचे नियम समजून घेता येतात आणि त्यानुसार कृती करून आकस्मिक नुकसान टाळता येते.

### टॅरो राशीभविष्य

## जून महिना मेष, सिंह, वृश्चिक राशींसाठी महत्त्वाचा; मेहनतीचे मिळेल फळ...

**जून २०२६ चे मासिक टॅरो राशीभविष्य सूचित करते की, हा महिना अनेक राशींसाठी भावनिक चढ-उतार घेऊन येऊ शकतो. दुरावलेली नाती, अपूर्ण राहिलेली संभाषणे किंवा जुन्या आठवणी पुन्हा जागृत होऊ शकतात. काही राशींना करिअर आणि भविष्याच्या नियोजनात सकारात्मक संधी मिळतील, तर काही जण नात्यांमधील सत्य समजून घेण्याचा प्रयत्न करतील. या महिन्यात अगदी लहान गोष्टीही खूप मोठ्या वाटू शकतात. मेष ते मीन पर्यंतच्या सर्व राशींसाठी टॅरो कार्ड काय सूचित करतात आणि तुमचा जून महिना कसा उलगडेल, हे जाणून घ्या...**




- मेष : जून महिना तुम्हाला क्षणभरही स्वस्थ बसू देणार नाही. कामाचा ताण कधीकधी जाणवेल. भविष्याचे विचार मनात रेंगाळतील आणि नात्यातील एखादी समस्या तुमचा मूड अचानक बदलू शकते. तुम्ही बाहेरून कणखर दिसाल, पण आतून भावनिक थकवा कायम राहू शकतो, विशेषतः जेव्हा तुम्हाला वाटेल की समोरची व्यक्ती तुमच्या अपेक्षेप्रमाणे समजूतदार नाही. महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात, काम आणि करिअरच्या बाबतीत गोष्टी सुधारतील. तुमच्या कठोर परिश्रमाची दखल घेतली जाऊ लागेल आणि तुम्हाला एक चांगली संधीही मिळू शकते. तथापि, सर्व काही एकट्याने हाताळण्याच्या तुमच्या सवयीमुळे तुम्ही मानसिकदृष्ट्या थकून जाऊ शकता. या महिन्यात स्वतःसाठी थोडा वेळ काढणे महत्त्वाचे आहे. शुभ रंगः लाल, शुभ अंकः ९
- वृषभ : नात्यातील दुरावा, एखादे अपूर्ण संभाषण किंवा वारंवार आठवण येणारी एखादी गोष्ट या महिन्यात पुन्हा समोर येऊ शकते, पण यावेळी तुम्हाला पूर्वीसारखे तुटल्यासारखे वाटणार नाही. महिन्याच्या मध्यात, नातेसंबंध किंवा तुमच्या भविष्याबद्दल महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील. तथापि, तुम्हाला काम आणि आर्थिक बाबींबद्दल थोडे अधिक मोकळे वाटेल. या महिन्यात, तुम्हाला जाणवेल की प्रत्येक गोष्ट धरून ठेवण्यापेक्षा मानसिक शांती राखणे अधिक महत्त्वाचे आहे. शुभ रंग : पांढरा, शुभ अंक : ६
- मिथुन : तुमचा आत्मविश्वास बाहेरून मजबूत दिसेल, परंतु आतून अनेक गोष्टी अस्पष्ट राहू शकतात. कोणाच्यातरी भावना, संमिश्र संकेत किंवा अपूर्ण संभाषणे तुमच्या मनात वारंवार अस्वस्थता निर्माण करू शकतात. कधीकधी, अंतर्ज्ञान एक गोष्ट सांगेल आणि समोरची व्यक्ती दुसरीच गोष्ट सांगेल. यामुळे या महिन्यात जास्त विचार करण्याची प्रवृत्ती वाढू शकते. जुन्या गोष्टी अधिक वेळा समोर येऊ शकतात, विशेषतः रात्रीच्या वेळी. तथापि, महिन्याच्या मध्यात एखादे नवीन संभाषण, संदेश किंवा भावनिक क्षण तुमचा मूड बदलू शकतो. सर्जनशील क्षेत्र, मीडिया, संवाद किंवा सामाजिक कार्यात गुंतलेल्या लोकांसाठी हा महिना चांगला असू शकतो. प्रत्येक गोष्टीत लपलेला अर्थ शोधण्याचा प्रयत्न करण्याऐवजी गोष्टी नैसर्गिकरित्या घडू देणे अधिक चांगले आहे. शुभ रंग : हिरवा, शुभ अंक : ५
- कर्क : जून महिन्यात बऱ्याच काळापासून साचलेला मानसिक ताण हळूहळू कमी होऊ शकतो. सर्व काही एकट्याने हाताळण्याच्या सवयीमुळे या महिन्यात तुम्हाला थकवा येऊ शकतो. कधीकधी असे वाटेल की इतर लोक तुमच्या जबाबदाऱ्या पाहत आहेत, पण तुमच्या भावना पाहत नाहीत. सततचे विचार, विशेषतः घर, कुटुंब किंवा कामाबद्दलचे, तणावाचे एक सततचे कारण असू शकतात. तथापि, महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात, गोष्टी थोड्या संतुलित वाटतील. काम, आर्थिक बाबी किंवा भविष्यातील नियोजनाबाबत एक चांगली संधी निर्माण होऊ शकते. काही लोकांना नवीन सुरुवात किंवा नवीन जबाबदाऱ्या देखील मिळू शकतात. या महिन्यात, तुम्हाला जाणवेल की प्रत्येक गोष्ट मनाला लावून घेण्याची गरज नाही. शुभ रंग : चंदेरी, शुभ अंक : २
- सिंह : एखाद्या व्यक्तीकडून जास्त अपेक्षा ठेवल्याने तुमच्या मनःस्थितीत चढ-उतार होऊ शकतात. कधीकधी समोरची व्यक्ती खूप जवळची वाटेल, तर इतर वेळी तीच व्यक्ती अचानक दूर गेल्यासारखी वाटू शकते. यामुळे, नातेसंबंध कोणत्या दिशेने जात आहेत हे तुम्हाला अनेकदा समजणार नाही. तथापि, हा महिना कामासाठी आणि सामाजिक जीवनासाठी चांगला असेल. नवीन लोकांना भेटणे, नेटवर्किंग करणे किंवा टीमसोबत काम करणे दीर्घकाळात फायदेशीर ठरू शकते. लोक तुमच्या उपस्थितीची दखल घेतील आणि तुमच्या शब्दांना महत्त्व दिले जाईल. प्रेमसंबंधांच्या बाबतीत कोणताही निष्कर्ष घाईने काढणे टाळणेच उत्तम. शुभ रंग : सोनेरी, शुभ अंक : १
- कन्या : जून महिना तुम्हाला भूतकाळातील काही गोष्टी सोडून देण्यास भाग पाडू शकतो. एखादे नाते, सवय किंवा भावनिक ओढ सोडणे कठीण वाटू शकते. तुम्ही वरवर व्यावहारिक राहण्याचा प्रयत्न कराल, परंतु तुमचे मन वारंवार भूतकाळातील गोष्टींकडे परत जाऊ शकते. तथापि, या महिन्यात तुम्ही पूर्वीपेक्षा अधिक हुशारीने वागाल. लोक तुमचे बोलणे आणि निर्णय गांभीर्याने घेऊ लागतील. महिन्याच्या अखेरीस, असे काहीतरी घडू शकते ज्यामुळे तुम्हाला खूप हलके वाटेल. तुम्हाला बऱ्याच काळानंतर स्वतःबद्दल चांगले वाटण्याची संधी देखील मिळू शकते. शुभ रंग : राखाडी, शुभ अंक : ७
- तूळ : जून महिना तुम्हाला मानसिकदृष्ट्या थोडा मंदावू शकतो. तुम्हाला कधीकधी लोकांपासून दूर राहावेसे वाटू शकते, विशेषतः जेव्हा भावना अनावर होतात. काही काळापासून अशी एखादी गोष्ट घडत असेल, जी सोडून देणे सोपे वाटत नसेल. या महिन्यात, तुम्ही हळूहळू त्यापासून स्वतःला दूर करण्याचा प्रयत्न कराल. तथापि, महिन्याच्या मध्यात काही परिस्थिती अचानक बदलू शकते. एखादा जुना गैरसमज दूर होऊ शकतो, किंवा अशी एखादी संधी निर्माण होऊ शकते, ज्यामुळे तुमचा मूड सुधारेल. या महिन्यात, तुमच्या लक्षात येईल की प्रत्येक गोष्ट धरून ठेवल्याने फक्त थकवा येतो. काही गोष्टी सोडून देणे महत्त्वाचे आहे. शुभ रंग : गुलाबी, शुभ अंक : ६
- वृश्चिक : तुम्ही बाहेरून स्थिर आणि एकाग्र दिसाल, पण तुमच्या मनात अनेक गोष्टी चालू असतील. तुम्ही काम, पैसा आणि भविष्याच्या नियोजनाबाबत खूप गंभीर राहाल, पण भावनांबाबत गैरसमज कायम राहू शकतात. कधीकधी, तुम्हाला असे वाटेल की तुम्हाला खूप काही हवे आहे, पण तुम्हाला स्पष्टता मिळत नाही. या महिन्यात, तुमच्या आजूबाजूला माणसे असूनही तुम्हाला थोडे एकटे वाटू शकते. जास्त विचार करणे वाढू शकते, विशेषतः रात्री. तथापि, हा काळ तुम्हाला स्वतःला समजून घेण्यास देखील मदत करेल. प्रत्येकाला तुमच्या भावना समजावून सांगण्याऐवजी, या महिन्यात तुम्ही स्वतःसोबत अधिक वेळ घालवण्यास प्राधान्य द्याल. शुभ रंग : मरून, शुभ अंक : ८
- धनु : तुम्हाला काही काळापासून त्रास देणाऱ्या एखाद्या गोष्टीवर ठाम निर्णय घेण्याची इच्छा होऊ शकते. एखादा नवीन प्रकल्प, कल्पना किंवा उपक्रम तुम्हाला पुन्हा प्रेरित करू शकतो. बऱ्याच काळानंतर, गोष्टी हळूहळू योग्य दिशेने जात आहेत असे वाटू शकते. हा महिना नातेसंबंध आणि कौटुंबिक जीवनासाठी देखील खूप महत्त्वाचा असू शकतो. प्रिय व्यक्तीसोबतचे अंतर कमी होऊ शकते किंवा एखादा जुना गैरसमज दूर होऊ शकतो. जरी लगेचच सर्व काही परिपूर्ण होणार नसले तरी, या महिन्यात तुमचे मन पूर्वीपेक्षा अधिक स्थिर वाटेल. शुभ रंग : पिवळा, शुभ अंक : ३
- मकर : जून महिना तुम्हाला थोडे अधिक परिपक्व आणि भावनिकदृष्ट्या मजबूत बनवू शकतो. अशी एखादी गोष्ट आहे, ज्याकडे तुम्ही काही काळापासून दुर्लक्ष करत आहात, परंतु तिचा प्रभाव अजूनही तुमच्या मनात रेंगाळत आहे. या महिन्यात, तुम्ही कोणत्या गोष्टींना धरून बसला आहात, असा प्रश्न तुमचे मन तुम्हाला वारंवार विचारू शकते. काही जण हळूहळू एखाद्या नात्यापासून, जुन्या आठवणींपासून किंवा भावनिक बंधापासून स्वतःला दूर करण्याचा प्रयत्न करतील. तथापि, हा महिना काम आणि भविष्यातील नियोजनासाठी शुभ आहे. एक नवीन जबाबदारी, शिकण्याची संधी किंवा एक छोटी नवीन सुरुवात भविष्यात लाभ मिळवून देऊ शकते. या महिन्यात, तुम्हाला हळूहळू समजेल की सर्व काही सोबत बाळगण्याची गरज नाही. काही गोष्टी मागे सोडल्याने तुमचे मन शांत होण्यास मदत होऊ शकते. शुभ रंग : नेव्ही ब्लू, शुभ अंक : १०
- कुंभ : जून महिन्यात बाहेरून सर्व काही ठीक चाललेले दिसेल, पण तुम्हाला आतून पूर्णपणे आनंद वाटणार नाही. कधीकधी, कोणत्याही महत्त्वाच्या कारणाशिवाय, तुम्हाला थोडे तुटल्यासारखे किंवा चिडचिड झाल्यासारखे वाटू शकते, विशेषतः जेव्हा गोष्टी तुमच्या गतीने घडत नाहीत. या महिन्यात छोट्या-छोट्या गोष्टींबद्दलची चिंता देखील वाढू शकते. तथापि, हा महिना काम आणि संवादाच्या बाबतीत खूप सक्रिय असेल. अचानक योजना आखल्या जाऊ शकतात, नवीन संवाद सुरू होऊ शकतात किंवा तुम्हाला एखादे महत्त्वाचे अपडेट मिळू शकते. तथापि, सर्व काही नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न केल्याने तुम्ही मानसिकरित्या थकून जाऊ शकता. या महिन्यात तुमच्यासाठी थोडे लवचिक असणे अधिक महत्त्वाचे असेल. शुभ रंग : आकाशी निळा, शुभ अंक : ११
- मीन : जून महिन्याचा तुमच्या भावनांवर आणि जुन्या आठवणींवर महत्त्वपूर्ण परिणाम होऊ शकतो. एखादी जुनी व्यक्ती, जुने संभाषण किंवा भूतकाळातील एखादी भावना अचानक परत येऊ शकते. कधीकधी, या महिन्यात तुम्हाला जुन्या गोष्टींची इतकी आठवण का येत आहे, हे तुम्हाला समजणारही नाही. तथापि, या महिन्यात तुम्ही पूर्वीपेक्षा अधिक स्वतःला संतुलित ठेवण्याचा प्रयत्न कराल. मोठा तणाव किंवा भावनिक धक्का टळल्यासारखे वाटू शकते. मीन राशीच्या मासिक टॅरो भविष्यानुसार, कुटुंब, जवळचे मित्र किंवा प्रिय व्यक्तीचा आधार मिळेल. या महिन्यात तुम्हाला जाणवेल की प्रत्येक भीती तितकी मोठी नसते, जितकी तुमचे मन तिला भासवते. शुभ रंग : सागरी हिरवा, शुभ अंक : १२

# पिंपरी-चिंचवडमधील फुगेवाडीत एकाच दिवशी सात जणांचा मृत्यू, तीन जणांवर उपचार सुरू

**मुंबई (प्रतिनिधी)** -पुणे-मुंबई महामार्गालगत असलेल्या पिंपरी-चिंचवडमधील फुगेवाडी भागात एकाच दिवशी तब्बल सात जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तर तिघांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या एकाच दिवशी झालेल्या सात मृत्यूने संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. फुगेवाडी गावातील आझाद चौकातील एका शोककुळाच्या फलकावर जेव्हा या सर्वांच्या निधनाची माहिती एकत्रितपणे प्रसिद्ध झाली, तेव्हा हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला.

धक्कादायक बाब म्हणजे, एकाच दिवशी गावातील सात जणांचा मृत्यू झाला असला तरी यापैकी कुणीही फिर्याद दिली नाही. त्यामुळे त्यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला असेल याचा तर्कवितर्क सुरू आहे.

या धक्कादायक घटनेनंतर फुगेवाडी परिसरात सध्या विविध चर्चांना उधाण आले आहे. गावातील आझाद चौक आणि परिसरात दोन ठिकाणी अवैध हातभट्टी आणि गावठी दारूचे अड्डे राजरोसपणे सुरू आहेत. त्यामुळे या सातही नागरिकांचा मृत्यू हा याच अड्ड्यांवरील विषारी किंवा भेसळयुक्त गावठी दारू पिल्यामुळेच झाला असावा, अशी भीती आणि दबक्या आवाजातील चर्चा स्थानिक नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. यामुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते.

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून दापोडी पोलिसांनी तातडीने या प्रकरणाचा प्राथमिक तपास सुरू केला. मात्र, पोलिसांनी तपासानंतर स्थानिक नागरिकांचे सर्व दावे आणि चर्चा फेटाळून लावल्या आहेत. पोलिसांच्या प्राथमिक तपासाअंती या सातही घटना पूर्णपणे वेगवेगळ्या आणि स्वतंत्र असल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे. सातपैकी चार मृतांना दारूचे कोणतेही व्यसन नव्हते आणि कोणत्याही नातेवाईकाने आपल्या माणसाने हातभट्टीची दारू पिल्याची साधी तक्रारही पोलिसात केलेली नाही, असे दापोडी पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### मृतांची नावे आणि पोलिसांची माहिती

दापोडी पोलिसांनी दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, मृत पावलेल्या सातही नागरिकांची पार्श्वभूमी आणि मृत्यूचे प्राथमिक कारण खालीलप्रमाणे समोर आले आहे.

१. पांडुरंग फुगे (वय ५७) : यांचा मृत्यू हा पूर्णपणे नैसर्गिक कारणाने झाला आहे. २. विजय राठोड (वय ३१) व राजेंद्र राठोड (वय ३४) : या दोन सख्ख्या भावांचा मृत्यू झाला असून, त्यांचा मृत्यू हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने झाला असावा, असा प्राथमिक अंदाज डॉक्टरांनी वर्तवला आहे.

३. राजेंद्र राजपूत (वय ५१) : हे घरात असताना अचानक बाथरूममध्ये चक्कर येऊन पडले. डोक्याला गंभीर दुखापत झाल्यानं त्यांचा जागीच मृत्यू झाला.

४. अकबर पठाण (वय ५२) : हे गेल्या १५ वर्षांपासून तीव्र दारूच्या सवयीचे होते. त्यांचा मृत्यू अतिमद्यप्राशनाने किंवा इतर आजाराने झाल्याची शक्यता आहे. ५. आनंद काशिनाथ निकाळजे ६. आनंद पांडेराव देसाई.

### शवविच्छेदन अहवालाची प्रतीक्षा

या संपूर्ण प्रकरणाचा पुढील सखोल तपास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली दापोडी पोलीस करत आहेत. एकाच दिवशी झालेल्या या सात मृत्यूंमागे कोणताही साखळी गुन्हा किंवा विषारी दारूचा संबंध नसल्याचं पोलिसांनी सुरुवातीला म्हटलं असलं, तरीही सर्व मृतदेहांचा शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नक्की आणि अचूक कारण काय होतं, हे वैद्यकीयदृष्ट्या स्पष्ट होईल.

# कुंभमेळ्यासाठी ६,१६२ कोटींच्या कामांना मंजुरी; कामांना मिळणार गती

**मुंबई(प्रतिनिधी)**-आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला जात आहे. कुंभमेळ्यात भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी कोट्यवधींच्या कामांचा धडाका नाशिक महापालिकेने लावला आहे. दरम्यान, कुंभमेळ्यासाठी ६,१६२ कोटींच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे. त्यामुळे विकास कामांना अधिक गती मिळेल.

कुंभमेळ्यासाठी मंजूर झालेल्या ६,१६२ कोटींच्या कामांमध्ये प्रामुख्याने घाट बांधणी, जोडरस्ते, रिंगरोड, जलशुद्धीकरण केंद्र, सीसीटीव्ही बसविणे, पूल बांधणी, पावसाळी गटाराची कामे, विद्युत वाहिन्या, ऑप्टिकल फायबर पाईप टाकणे, वाढीव पाणीपुरवठा आदी ६८ प्रकारची कामे मार्गी लावली जाणार आहेत.

कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकवरील पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, आरोग्य सुविधा, विद्युत पुरवठा, सुरक्षा व्यवस्था आदी पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणावर ताण येणार आहे. त्याकरिता नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाकडून कुंभमेळ्याकरिता दोन टप्प्यांमध्ये ६८ पायाभूत सुविधा प्रकल्पांचे प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आले होते.

यात वाहतुकीच्या नियोजनाकरिता रेल्वे, महामार्गाला जोडणारे रस्ते प्रामुख्याने बांधले जाणार आहेत. याशिवाय गोदावरीच्या घाटाकडे जाणाऱ्या रस्त्यांची दुरूस्ती केली जाणार आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकमध्ये येणाऱ्या वाहनांचे नियोजन करण्याकरिता अनेक ठिकाणी वाहनतळ उभारली जाणार आहेत. या वाहनतळांना प्रमुख ठिकाणांशी जोडणारे रस्ते विकसित केले जातील.


## Change In Name

My old name is GANGADHAR VITTHAL KADAM which now I am changing to new name as GANGADHAR VITHALRAO KADAM Henceforth my all official correspondence will be done as per my new name. Please consider this public declaration. Address -GANGADHAR KADAM, Nath Nagar, Nanded Mo. No. 9923074343


# पावसाळी मासेमारी बंदी लागू; नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई, सरकारचा निर्णय



**मुंबई(प्रतिनिधी)**-मासळीच्या साठ्याचे जतन तसेच मच्छीमारांच्या जीवित व वित्त रक्षणाच्या उद्देशाने राज्य शासनाने महाराष्ट्राच्या सागरी जलक्षेत्रात पावसाळी मासेमारी बंदी लागू केली आहे. मत्स्यव्यवसाय विभागाच्या आदेशानुसार १ जून २०२६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत (दोन्ही दिवस धरून) महाराष्ट्राच्या सागरी किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपर्यंत यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौकांना मासेमारी करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

मत्स्यव्यवसाय विभागाने जारी केलेल्या सूचनेनुसार, या कालावधीत समुद्रात मासेमारीसाठी जाणाऱ्या नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा) २०२१ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व मच्छीमार, नौका मालक, तांडेल आणि खलाशी यांनी शासनाच्या आदेशांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पावसाळी हंगामात समुद्र खवळलेला असतो. त्यामुळे मासेमारी करताना अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच या काळात विविध माशांच्या प्रजातींचा प्रजनन कालावधी असल्याने मासेमारी बंदीमुळे मत्स्यसंपत्तीचे संवर्धन होण्यास मदत होते. या निर्णयामुळे भविष्यात मच्छीमारांना अधिक प्रमाणात मासळी उपलब्ध होऊन आर्थिक लाभ होणार असल्याचे मत मत्स्यव्यवसाय विभागाकडून व्यक्त करण्यात आले आहे.

सर्व संबंधितांनी शासनाच्या नियमांचे पालन करून सहकार्य करण्याचे आवाहन मुंबई शहरचे मत्स्यव्यवसाय सहायक आयुक्त यांनी केले आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

दोन महिने मासेमारी बंद राहणार असल्याने या काळात खवय्यांना पर्याय म्हणून चिकन मटणवर ताव मारावा लागणार आहे. याच कालावधीत श्रावण महिनाही असल्याने नारळी पौर्णिमेनंतर मासेमारी सुरू झाल्यावर पुन्हा एकदा नव्या दमाने खवय्ये माशांचा आस्वाद घेण्यास तयार होणार आहेत.

# थलपती विजय यांनी घेतली पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**-तामिळनाडूचे नवनियुक्त मुख्यमंत्री आणि प्रसिद्ध अभिनेते जोसेफ विजय (थलपती विजय) हे सध्या आपल्या पहिल्याच अधिकृत दिल्ली दौऱ्यावर आहेत. मुख्यमंत्रिपदाची धुरा हाती घेतल्यानंतर त्यांनी पहिल्यांदाच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. या हाय-प्रोफाइल भेटीमुळे राष्ट्रीय आणि तामिळनाडूच्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाल्या आहेत. 'विजय सेवा तीर्थ' येथे पार पडलेल्या या बैठकीत दोन्ही नेत्यांमध्ये राज्याच्या विकासाच्या मुद्द्यांवर महत्त्वपूर्ण चर्चा झाल्याचे समजते आहे.

## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, स्थित नांदेड ता. जि. नांदेड येथील नमस्कार चौक, पांडुरंग नांदेड येथील सर्वे नंबर 19 पैकी नगर भुमापन क्रमांक 9994 व 9995 एकुण क्षेत्रफळ 4800 चौ. फुट सदर मिळकत गंगामाता निवास या नावे सदर ठिकाणी स्थित असलेल्या वरील नमुद मिळकतीमध्ये 1600 चौ. फुट पक्के घर बांधलेले असुन सदर मिळकतीच्या दोन्ही बाजुने रोड आहे उर्वरित जागा मोकळी व चारही बाजुनी आर.सी.सी. पक्के कुंपन केलेली आहे. सदरील जागा माझे पक्षकार शिवाजी तुळशीराम पाटील किन्हाळकर हे विकास कामासाठी मुळ मालक किशोर निवृत्तीराव सोनुले रा. नांदेड यांच्याकडुन काही अटी व शर्ती आधरे विकास काम व बांधकाम करण्यासाठी करारनामा करुन घेतलेली आहे. त्यानुसार सदर मिळकतीमध्ये तळमजला व सहा मजली इमारत बांधकाम करण्याचे ठरले असुन एकुण निवासी बांधकाम क्षेत्रापैकी 50 टक्के बांधकाम हे मुळ जमीन मालक यांचे राहील व 50 टक्के निवासी बांधकाम हे माझे पक्षकार शिवाजी तुळशीराम पाटील किन्हाळकर यांचे राहील तसेच एकुण बिगर निवासी बांधकामापैकी 55 टक्के बांधकाम हे मुळ मालक यांचे राहील व उर्वरित बिगर निवासी 45 टक्के जागा माझे पक्षकार शिवाजी तुळशीराम पाटील किन्हाळकर यांचे राहील. तसेच सदर बांधकामासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, भुमी अभिलेख यांच्या कार्यालयातुन संबंधी सर्व परवानग्या, विमानतळ प्रधीकरण परवानगी, रस्ते विकास महामंडळ परवानगी, एकंदर तळ मजला व सहा मजली निवासी व बिगर निवासी आर.सी.सी. बांधकाम व उच्च दर्जाच्या फिनिशिंग सहीत सदर बांधकाम करण्याची जबाबदारी माझे पक्षकार शिवाजी तुळशीराम पाटील किन्हाळकर यांनी मान्य केली आहे व तसा करारनामा माझे पक्षकार शिवाजी तुळशीराम पाटील किन्हाळकर व मुळ मालक किशोर निवृत्तीराव सोनुले यांच्यामध्ये झालेला आहे. त्यानुसार माझे पक्षकार हे करारनाम्याप्रमाणे वरील मिळकतीमध्ये सर्व कायदेशीर प्रक्रीया पुर्ण करुन बांधकाम सुरु करणार आहेत.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, वरील वर्णनाच्या मालमत्तेबाबत कोणाचा काही आक्षेप, उजर, तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यानंतर आठ दिवसामध्ये मुळ कागदपत्रासह आपला लेखी आक्षेप, उजर, तक्रार नोंदवावी मुदतीनंतर आलेल्या आक्षेपास व तक्रारीस माझे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

करिता सबब हे जाहीर प्रगटन देत आहे.

मार्फत
ॲड. शिवाजी व्ही. कदम
नागापुरकर
जिल्हा व सत्र न्यायालय, भोकर
मो.नं. 8806759722

जाहीर प्रगटन देणार
शिवाजी तुळशीराम पाटील किन्हाळकर
रा.भोकर ता. भोकर जि. नांदेड
मो.नं. 9422148822

## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व नांदेड जिल्हा तथा नांदेड शहरातील तरोडा (बु.) विकास नगर नांदेड येथील जनतेस कळविण्यात येते की, श्रीमती कांताबाई जळबा पुंडगे वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा. वैभव नगर नांदेड ता. जि. नांदेड यांनी परिसर अभियांत्रिकी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत विकास नगर नांदेड येथे दाखल केलेल्या अर्जानुसार व कागदपत्रानुसार पुढील जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

परिसर अभियांत्रिकी सहकारी गृहनिर्माण संस्था विकास नगर नांदेड येथील प्लॉट क्र. १५, ब्लॉक नंबर २, ज्याचा एरिया २१६ स्वे. मीटर असून, त्याच्या चर्तुसिमा पुढील प्रमाणे-

पूर्वेस-प्लॉट नं. १४, पश्चिमेस प्लॉट नं. १६,
दक्षिणेस-रोड व उत्तरेस प्लॉट क्रमांक ३२, ३३.

याप्रमाणेवरीलचतुःसिमेच्याआतीलप्लॉटक्रमांक१५ज्याचेमूळ मालक श्रीमती कांताबाई जळबा पुंडगे हे असून त्या स्वतःच्या राजीखुशीने व मर्जीने आपल्या वारसापैकी श्री सुनिल जळवा पुंडगे वय ४६ वर्षे, धंदा-वैद्यकीय व्यवसाय रा. भायखळा मुंबई महाराष्ट्र यांच्या नावे हस्तांतरण करण्यासाठी अर्ज व हस्तांतरण शपथपत्र, करारनामा, वारसा प्रमाणपत्र तथा वारसांचे संमतीपत्र संस्थेकडे प्राप्त झाले असून, संबंधित प्लॉट हस्तांतरण अलॉटमेंट सर्टिफीकेट व शेअर्स प्रमाणपत्र वारसदार सुनिल जळबा पुंडगे यांच्या नावावर करण्याअगोदर गृहनिर्माण संस्था तमाम जनतेस सूचित करते की, जर संबंधित जागा अर्जदाराच्या नावे हस्तांतरीत करण्यासाठी कुणाचा आक्षेप असेल, सदर जागेवर जर कुणाचा उजर, हक्क संबंध, बँकेचा कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, तारण, लिज, शेजार ताबा, वाद, शासकीय, निम शासकीय कर्ज असेल किंवा वारसांपैकी कुणाचा उजर असेल तर सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील दिलेल्या कार्यालयीन पत्यावर लेखी उजर/आरोप दाखल करून रितसर पोहोच पावती घ्यावी. मुदतीत जर कुणाचा आक्षेप न आल्यास सदरील प्लॉट हा पूर्णतः निर्विवाद व निर्जोखीम आहे असे समजून अर्जदार श्री सुनील जळबा पुंडगे यांच्या नावे मूळ अलॉटमेंट प्रमाणपत्र व मूळ शेअर्स प्रमाणपत्र ट्रान्सफर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

जाहीर प्रगटन देणार
अध्यय/सचिव
परिसर अभियांत्रिकी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत
विकास नगर तरोडा (बु.) नांदेड
मो. ८६६८५७६२१४

# उष्णतेच्या लाटेत विशेष खबरदारी घ्या; पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली(वृत्तसंस्था)**-दिल्ली, हरियाणा, राजस्थान, मध्य प्रदेश आणि पंजाबसह अनेक राज्यांमध्ये तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या आसपास होते. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना या उष्णतेच्या लाटेत विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की, देशाच्या विविध भागांमध्ये तापमान सतत वाढत आहे, ज्यामुळे लोकांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी वाढत आहेत. त्यांनी लोकांना शक्य तितके सतर्क राहण्याचा आणि शरीरात पाण्याची पातळी टिकवून ठेवण्याचा सल्ला दिला.

पंतप्रधानांनी लोकांना घराबाहेर पडताना नेहमी पाणी सोबत ठेवण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, या हवामानात संवेदनशीलता आणि परस्पर सहकार्य मोठा आधार ठरू शकतो. पंतप्रधान मोदींनी जनतेला आवाहन केले की, शक्य असल्यास तहानलेल्या व्यक्तीला एक ग्लास पाणी द्यावे. जे लोक आपल्या घराबाहेर आणि दुकानाबाहेर घागरींमध्ये पाणी ठेवतात जेणेकरून ये-जा करणारे लोक ते पिऊ शकतील, त्यांचेही त्यांनी कौतुक केले.

## दिग्गज नेमबाज रणधीर सिंग यांचे निधन

**नवी दिल्ली(वृत्तसंस्था)**-जागतिक स्तरावर भारताचा दबदबा निर्माण करणारे दिग्गज नेमबाज तसेच ज्येष्ठ क्रीडा प्रशासक राजा रणधीर सिंग यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी निधन झाले. वयोमानानुसार उद्भवलेल्या विविध आरोग्य समस्यांमुळे गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचार सुरू असतानाच २७ मे २०२६ रोजी त्यांनी अंतिम श्वास घेतला.

# लग्नाचे आमिष दाखवून दोन महिलांनी व्यावसायिकाला लुटलं, ५५ लाखांची फसवणूक, दोघींनाही अटक

**मुंबई(प्रतिनिधी)**-लग्नाचे आमिष दाखवून महिलांची फसवणूक झाल्याच्या घटना आपण नेहमीच ऐकत असतो. मात्र, कल्याणमध्ये चक्क दोन महिलांनी मिळून एका नामांकित व्यावसायिकाला लग्नाच्या जाळ्यात ओढून तब्बल ५५ लाख रुपयांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी महात्मा फुले चौक पोलिसांनी दोन्ही आरोपी महिलांना अटक केली आहे.

कल्याण पश्चिमेतील एका नामांकित दुकानाच्या मालकाची ओळख जयश्री पाटील हिने मुंबईत राहणाऱ्या रोमा परदेशी हिच्याशी करून दिली होती. रोमा एका मोठ्या इन्शुरन्स कंपनीत काम करत असल्याचे सांगत तिने व्यावसायिकाशी जवळीक वाढवली. सुरुवातीला इन्शुरन्स पॉलिसीच्या माध्यमातून ओळख निर्माण केली आणि त्यानंतर विश्वास संपादन केला. रोमा परदेशी हिने इन्शुरन्स च्या नावाखाली व्यावसायिकाकडून लाखो रुपये घेतले मात्र इन्शुरन्स पॉलिसी उघडण्यात आली नाही. काही दिवसानंतर रोमा हिने जयश्री पाटील मार्फत संबंधित व्यावसायिकासोबत लग्न करण्याची तयारी दर्शवली. लग्नासाठी होकार दिल्यानंतर दोन्ही महिलांनी वेळोवेळी विविध कारणे सांगत संबंधित व्यावसायिकाकडून पैसे घेतले. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, आतापर्यंत सुमारे ५५ लाख रुपये या दोघींना दिले आहेत.

फसवणुकीची बाब लक्षात आल्यानंतर व्यावसायिकाने महात्मा फुले पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली. या प्रकरणात पोलिसांनी काही दिवसांपूर्वी रोमा परदेशी हिला अटक केली होती. तिला नंतर जामीन मिळाला. दरम्यान, तपासादरम्यान पोलिसांनी तिची मैत्रीण जयश्री पाटील हिला कोल्हापूरमधून अटक केली. तक्रारदार व्यावसायिकाने पोलिसांकडे आपले पैसे परत मिळवून देण्याची मागणी केली आहे. लग्नाचे आमिष दाखवून माझ्यासोबत फसवणूक करण्यात आली. आरोपींकडून रक्कम वसूल करून मला न्याय मिळावा, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. या प्रकरणाच्या तपासता महात्मा फुले पोलीस करीत आहेत.

## जाहीर प्रगटन

अपंग कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. नांदेड ता. जि. नांदेड या संस्थेच्या सर्व सभासद/मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणूक सन २०२६-२०३१ या कालावधीचा निवडणूक कार्यक्रम दिनांक २९/०५/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येत असून, उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा कालावधी दिनांक ०१/०६/२०२६ ते ०५/०६/२०२६ आहे. प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक ०८/०६/२०२६ रोजी करण्यात येणार असून वैध नामनिर्देशन पत्राची यादी दि. ०९/०६/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी दिनांक ०९/०६/२०२६ ते २३/०६/२०२६ आहे. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादी प्रसिध्दी दिनांक २४/०६/२०२६ करण्यात येणार आहे. आवश्यकता असल्यास मतदान दिनांक ०४/०७/२०२६ रोजी उपनिबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयात घेण्यात येणार असून मतदान संपल्यानंतर लगेच मतमोजणी करण्यात येणार आहे व निकाल जाहीर करण्यात येणार आहे. संस्थेच्या निवडणुकीचा निवडणूक कार्यक्रम संस्थेच्या व उपनिबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयाचे नोटीस बार्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे यांची सर्व सभासद/मतदारांना नोंद घ्यावी.

(बी.एम.बुक्तरे)
निवडणूक निर्णय अधिकारी
अपंग कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. नांदेड
ता. जि. नांदेड.

कार्यालय

## जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड

संचिका क्र. ६९/७६/२०२६ नांदेड

## जाहीर प्रगटन

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरिता योजना मंजूर करणे बाबत.

वक्फ संस्थेचे नाव-वक्फ संस्था नामे मस्जिद दर्गा कब्रस्तान आणि दिनी स्कूल पत्ता- अरब गल्ली, नांदेड ता. जि. नांदेड

उपरोक्त वक्त संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास नोंदणीकृत असून, अर्जदार मोहम्मद महेबुब अली खान मोहम्मद अली खान तडवी व इतर (४) लोकांनी या कार्यालयात योजना गठीत करण्यासाठी दि. १२/०५/२०२६ रोजी सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरिता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारूप योजना दाखल केली आहे. प्रारूप योजनेतील तरतुदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ (५) वर्षांचा असून, व्यवस्थापन समिती निवडीची रिक्त निवडणुकीद्वारे अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | मोहम्मद महेबुब अली खान पि. मोहम्मद अली खान तडवी | अध्यक्ष |
| २. | अब्दुल रज्जाक अब्दुल हमीद | उपाध्यक्ष |
| ३. | मुश्ताक अहेमद खान ताऊद खान | सचिव |
| ४. | इनायत अली खान मोहम्मद खान | सहसचिव |
| ५. | मोहम्मद जियाउल्लाह खान मोहम्मद सादुल्ला खान | कोषाध्यक्ष |
| ६. | आसिफ अली खान जमशेद अली खान | सदस्य |
| ७. | अब्दुल रहीम सैकलगर अब्दुल रहेमान सैकलगर | सदस्य |
| ८. | इलियास खान अबेद अली खान | सदस्य |
| ९. | मोहम्मद अब्राहीम आरीफ खांडा | सदस्य |
| १०. | रहमत अली खान पिता असद खान | सदस्य |
| ११. | अब्दुल समी अब्दुल सईद | सदस्य |

सदर प्रारूप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांना सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय नांदेड, पत्ता- मस्जिद जुनी ईदगाह नांदेड येथे आपले म्हणणे लेखी स्वरूपात सादर करावे विहित वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

मो. मोतासिम अन्सारी
जिल्हा वक्फ अधिकारी नांदेड

## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस तथा नांदेड जिल्हा व नांदेड शहरातील तरोडा (बु.) विकास नगर नांदेड येथील जनतेस कळविण्यात येते की श्रीमती शकुंतला विश्वनाथ तेलंग वय ५५ वर्षे, धंदा -घरकाम, रा. विकास नगर तरोडा (बु.) नांदेड यांनी परिसर अभियांत्रिकी सह. गृहनिर्माण संस्था मर्यादीत विकास नगर नांदेड येथे दाखल केलेल्या अर्जानुसार व कागदपत्रानुसार पुढील जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

परिसर अभियांत्रिकी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. विकास नगर नांदेड येथील प्लॉट क्रमांक २(ए) ब्लॉक नंबर १ ज्याचा एरिया १६१ स्क्वेअर मीटर असून, ज्याच्या चतुःसिमा पुढीलप्रमाणे आहेत.

पूर्वेस-प्लॉट नंबर २ (बी),
पश्चिमेस-प्लॉट नं. १ (बी),
दक्षिणेस-तुळजा भवानी संस्था
उत्तरेस-रोड.

या चतुःसिमेच्या आतील प्लॉट क्रमांक २ (बी) ज्यावर घर बांधकाम केलेले आहे. ज्याचे मूळ मालक श्री विश्वनाथ नागम्मा तेलंग हे दिनांक १८/१०/२०२५ रोजी मयत झाल्यामुळे अर्जदार श्रीमती शकुंतला विश्वनाथ तेलंग ह्या त्यांच्या पत्नी अजून कायदेशीर वारसदार असल्याने संबंधित वर वर्णन केलेला प्लॉट व ज्यावर बांधकाम केलेले आहे. सदरील मालमत्ता ही अर्जदाराच्या नावे करण्यासाठी अर्ज, पतीचे मृत्यू प्रमाणपत्र, हस्तांतरण शपथपत्र, एक अलॉटमेंट प्रमाणपत्र व शेअर्स प्रमाणपत्र संस्थेकडे प्राप्त झाले असून, संबंधित प्लॉट-घर हस्तांतरण अलॉटमेंट सर्टिफिकेट व शेअर्स प्रमाणपत्र अर्जदार श्रीमती शकुंतला विश्वनाथ तेलंग यांच्या नावावर करण्याअगोदर गृहनिर्माण संस्था तमाम जनतेस सूचित करते की जर संबंधित प्लॉट घरावर कुणाचा आक्षेप, उजर, हक्क संबंध, बँकेचा कर्जबोजा, गहाणखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, तारण, लिज, शेअर ताबा, वाद, शासकीय-निमशासकीय कर्ज असेल किंवा वारसापैकी कुणाचा उजर असेल तर सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांच्या आत खालील दिलेल्या कार्यालयीन पत्यावर लेखी उजर/आक्षेप दाखल करून रितसर पोहोच घ्यावी. मुदतीत जर कोणाचाही आक्षेप न आल्यास सदरील प्लॉट हा पूर्णतः निर्विवाद व निर्जोखीम आहे असे समजून अर्जदार श्रीमती शकुंतला विश्वनाथ तेलंग यांच्या नावे मूळ अलॉटमेंट व मूळ शेअर्स प्रमाणपत्र ट्रान्सफर करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

जाहीर प्रगटन देणार
अध्यक्ष/सचिव
परिसर अभियांत्रीकी सहकारी गृहनिर्माण
संस्था मर्यादित विकासनगर
तरोडा बु. नांदेड
मो. ८६६८५७६२१४


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# नांदेड शहरामध्ये बकरी ईद उत्साहात साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात गुरुवार, दिनांक २८ मे रोजी ईद-उल-अझहा (बकरी ईद) हा धार्मिक उत्सव शांतता आणि आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी साडेआठ वाजता शहरातील ऐतिहासिक ईदगाह मैदानावर मुख्य नमाज पठण करण्यात आले. या प्रसंगी शहर व परिसरातील हजारो मुस्लीम बांधवांनी एकत्र येत सामूहिक नमाज अदा केली. सकाळपासूनच ईदगाह परिसरात अध्यात्म, एकता आणि बंधुत्वाचे एक सुंदर चित्र पाहायला मिळाले.

त्याग, प्रेम आणि माणुसकीचा संदेश नमाज पठणापूर्वी प्रख्यात धर्मपंडित मुफ्ती खलील-उर-रहमान यांनी उपस्थिताना दिला. आपल्या विशेष भाषणात त्यांनी ईद-उल-अझहाचे महत्त्व सांगताना, हजरत इब्राहिम (अ.स.) व हजरत इस्माईल (अ.स.) यांच्या बलिदानाच्या महान परंपरेवर (सुन्नत) प्रकाश टाकला. ईद-उल-अझहा हा सण आपल्याला निःस्वार्थता, त्याग, प्रेम आणि माणुसकीचा धडा शिकवतो. या पवित्र दिवशी आपण आपल्या समाजातील गरीब, वंचित आणि गरजू लोकांची विशेष काळजी घेतली पाहिजे, हाच या सणाचा खरा संदेश आहे, असे आवाहन मुफ्ती खलील-उर-रहमान यांनी केले.

**देश आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी विशेष प्रार्थना**

ईदची मुख्य नमाज मौलाना साद अब्दुल्ला यांनी पठण केली, तर मुहम्मद झुबैर फारुकी यांनी प्रवचन दिले. या प्रवचनात मुस्लीम उम्माची एकता, शांतता आणि बंधुभाव टिकवून ठेवण्यावर भर देण्यात आला.

नमाजनंतर मौलाना साद अब्दुल्ला यांनी सामूहिक दुवा (प्रार्थना) मागितली. यामध्ये देशाची प्रगती, समृद्धी, राष्ट्रीय सुरक्षा, शांतता आणि सर्व धर्मीयांमधील सौहार्द टिकून राहण्यासाठी विशेष प्रार्थना केली.

नमाज आटोपल्यानंतर ईदगाह मैदान आणि परिसरात एकच जल्लोष पाहायला मिळाला. लहान मुले, तरुण आणि वडीलधाऱ्यांनी एकमेकांची गळाभेट घेऊन 'ईद मुबारक' म्हणत शुभेच्छा दिल्या.

नागरिकांना नमाजसाठी येण्या-जाण्यात कोणताही अडथळा येऊ नये यासाठी स्थानिक पोलीस प्रशासन आणि मनपाच्यावतीने ईदगाह परिसरात चोख बंदोबस्त आणि वाहतुकीचे उत्तम नियोजन करण्यात आले. एकूणच नांदेड शहरातील हा सोहळा शांततेत आणि पारंपरिक उत्साहात संपन्न झाला. यावेळी शहरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नांदेड जिल्ह्यात स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू मोहिमेचे आयोजन

## लोकसहभागातून स्वच्छता व पर्यावरण संरक्षणाला चालना

**नांदेड (प्रतिनिधी)** –जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नांदेड जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये दि. १ जून ते ५ जून या कालावधीत स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू मोहीम राबविण्यात येणार आहे. ग्रामस्थांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी केले आहे.

जिल्ह्यात पाणी व स्वच्छता मिशन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेद्वारे ग्रामीण भागात स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, हवामान बदलाबाबत जनजागृती तसेच पर्यावरण संरक्षणासाठी लोकसहभाग वाढविण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

मोहिमेअंतर्गत प्लास्टिक कचरा कमी करणे, कचऱ्याचा पुनर्वापर करणे, सांडपाण्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन, कचऱ्यापासून खत व उपयुक्त वस्तू निर्मिती, ओला व सुका कचरा विलगीकरण तसेच पर्यावरणपूरक जीवनशैलीचा प्रसार याबाबत व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे.

ग्रामपंचायत स्तरावर स्वच्छता अभियान, श्रमदान, स्वच्छता शपथ, वृक्षारोपण, जनजागृती रॅली, शाळा व अंगणवाडी स्तरावरील विविध उपक्रम तसेच विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात येणार आहे.

दि. १ एप्रिल २०२६ पासून लागू झालेल्या घनकचरा व्यवस्थापन नियमांबाबत ग्रामस्थांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात येणार असून, गावपातळीवर कचऱ्याचे चार प्रकारांमध्ये वर्गीकरण, प्लास्टिकमुक्त परिसर निर्मिती, सांडपाणी व्यवस्थापन तसेच सामुदायिक स्वच्छता सुविधांच्या प्रभावी वापराबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. मोहिमेचा समारोप दि. ५ जून रोजी विशेष ग्रामसभेद्वारे करण्यात येणार आहे.

या मोहिमेत सर्व गट विकास अधिकारी, ग्रामपंचायती, अधिकारी-कर्मचारी, स्वयंसेवी संस्था, युवक मंडळे, महिला बचत गट तसेच नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी मयूरकुमार आंदेलवाड तसेच ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब यांनी केले आहे.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाकडून संलग्नित २९ महाविद्यालयांमधील पदव्युत्तर प्रवेशांना स्थगिती

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कडक पाऊल उचलले आहे. विद्यापीठांतर्गत येणाऱ्या ज्या पदव्युत्तर पारंपरिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण ऑनलाईन तपासणीमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण म्हणजेच 'F' ग्रेड मिळालेली आहे, अशा तब्बल २९ महाविद्यालयांमधील प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याचे (स्थगित करण्याचे) आदेश विद्यापीठाने जारी केले असल्याचे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने २७ मे, २०२६ रोजी या संदर्भातील अधिकृत परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे स्पष्ट इशारा दिला आहे की, त्रुटी आढळलेल्या व प्रतिबंधित केलेल्या यादीतील महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पारंपरिक पदव्युत्तर अभ्यासक्रमास कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश देऊ नये. जर एखाद्या महाविद्यालयाने या आदेशाचे उल्लंघन करून विद्यार्थ्यांना प्रवेश दिला, तर विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या सर्व शैक्षणिक नुकसानीस (उदा. पात्रता रद्द होणे, परीक्षा अर्ज न स्वीकारणे, हॉलतिकीट न मिळणे किंवा निकाल राखीव राहणे) सर्वस्वी ते महाविद्यालय प्रशासन जबाबदार असेल.

हा निर्णय केवळ पारंपरिक पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनाच लागू राहील. फार्मसी, विधी, शिक्षणशास्त्र, आणि शारीरिक शिक्षणशास्त्र यांसारख्या व्यावसायिक महाविद्यालयांना या निर्णय व कारवाईतून वगळण्यात आले आहे.

विद्यापीठाने जाहीर केलेल्या 'Score' च्या एकूण ७२ महाविद्यालयांच्या यादीमध्ये केवळ पाच महाविद्यालयांना 'O' ग्रेड आणि आकरा महाविद्यालयांना ग्रेड मिळवता आला आहे. तर 'B' ग्रेड १३ महाविद्यालये, 'C' ग्रेड ४ महाविद्यालये, 'D' ग्रेड ५ महाविद्यालये, 'E' ग्रेड ५ महाविद्यालये आणि सर्वात जास्त म्हणजेच एकोणतीस महाविद्यालये 'F' ग्रेड श्रेणीत फेकली गेल्याने त्यांच्यावर ही नामुष्की ओढावली आहे.

विद्यापीठाने प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याचे (स्थगित करण्याचे) आदेशामध्ये नांदेड जिल्ह्यातील सर्वाधिक आठरा महाविद्यालये, लातूर जिल्ह्यातील सात आणि परभणी जिल्ह्यातील चार महाविद्यालयांचा समावेश आहे. यामध्ये 'F' ग्रेड प्राप्त अनेक नामांकित महाविद्यालयांचा समावेश आहे.

विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्या परिषद व अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांच्या अध्यक्षतेखाली हा कडक निर्णय घेतला आला. अधिकृत यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ॲफिलेशन या शीर्षकाखाली उपलब्ध करण्यात आली असल्याचे शैक्षणिक (संलग्नीकरण) विभागाचे उपकुलसचिव यांनी कळविले आहे.

# खा. श्रीकांत शिंदेंच्या ताफ्यातील वाहने एकमेकांवर आदळली



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा दौऱ्यावर आलेले शिवसेनेचे खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या ताफ्यातील वाहनांना अपघात झाला. नांदेडहून नायगावकडे जाताना ताफ्यातील एका वाहन चालकाने अचानक ब्रेक लावल्याने पाठीमागील तीन वाहने एकमेकांवर आदळली. यामुळे काहीवेळ धावपळ उडाली. यात वाहनांचे मोठे नुकसान झाले.

शिवसेनेचे खा. डॉ. श्रीकांत शिंदे हे शिवसंवाद दौऱ्यानिमित्त नांदेडात आले आहेत. गुरुवारी सकाळी नांदेडहून खा. श्रीकांत शिंदे हे आपल्या वाहनांच्या ताफ्यासह पक्षाच्या आढावा बैठकीसाठी नायगावकडे निघाले होते. शहरातून निघाल्यानंतर साठे चौक येथे त्यांच्या ताब्यातील एका वाहनासमोर एक व्यक्ती अचानक आला. त्यामुळे चालकाने ब्रेक मारला. परिणामी वेगात असलेली मागची तीन वाहने एकमेकांवर आदळली. या अपघातामुळे पोलीस आणि पदाधिकाऱ्यांची धावपळ उडाली. मात्र सुदैवाने या अपघातात कुणालाही दुखापात झाली नाही. वाहनांचे मात्र नुकसान झाले.

# ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक श्रीमती चंपाबाई मामडे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**–कंधार येथील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक चंपाबाई गंगाधरराव मामडे यांचे दि.२७ मे २६ रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर २८ मे रोजी कंधार येथील हिंदू स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, नातू, पणतू असा परिवार आहे.

# भाऊराव तिडके यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरापासून जवळच असलेल्या बोंढार हवेली येथील ज्येष्ठ नागरीक भाऊराव राजाराम तिडके यांचे अल्पशा आजाराने एका खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान गुरुवार, दि. २८ मे रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सकाळी ११ वाजता बोंढार हवेली येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# दत्ता निवडंगे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते संजय निवडंगे यांचे वडील दत्ता लक्ष्मण निवडंगे यांचे गुरुवार, दि. २८ मे रोजी निधन झाले. पिंपळगाव कोरका येथील मूळ निवासी असलेले दत्ता निवडंगे हे नांदेड येथील बॅरिस्टर खोब्रागडेनगर नंबर १ मधील रहिवासी होते. त्यांच्या पश्चात ५ मुले, २ मुली, सुना, जावई, नातू, पणतू असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी दुपारी १२ वाजता गोवर्धनघाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# इंदिराबाई भैरवाड यांचे निधन



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)**–येथील ज्येष्ठ महिला कै. इंदिराबाई दत्तात्रय भैरवाड यांचे गुरुवार, दि.२८ मे रोजी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी सायंकाळी नायगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुली व सून, नातू, नातवंडे असा परिवार आहे. बेटमोगरा येथील जि. प. हायस्कूलचे मुख्याध्यापक यादवराव भैरवाड यांच्या त्या आई होत.

# नारायण मेहता यांचे निधन



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)**–नरसी येथील ज्येष्ठ नागरिक नारायण वालजी मेहता (वय ७५) यांचे बुधवार, दि. २७ मे रोजी निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. नरसी येथील प्रसिद्ध लक्ष्मी केक बेकरीचे संचालक अर्जुन मेहता व मोहन मेहता यांचे ते वडील होत. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी नरसी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सटवाजी हिरे यांचे निधन

**भोकर (प्रतिनिधी)–** बल्लाळ येथील ज्येष्ठ नागरिक सटवाजी नरसिंगा हिरे यांचे गुरुवार दि. २८ मे २०२६ रोजी निधन झाले.



त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, नातू, पणतू असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर गुरुवार, दि. २८ मे रोजी सायंकाळी ५ वाजता बल्लाळ येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. सटवाजी हिरे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान बुद्ध यांच्या जीवनावर गायक करीत प्रबोधन करीत.

# छोट्या जाहिरात व्यावसायिकांवर मनपाकडून कारवाईचा बडगा, बड्यांना मात्र अभय!

**नांदेड (प्रतिनिधी)–** छोट्या जाहिरात व्यावसायिकांवर कारवाईचा बडगा आणि बड्या धेंडांना मात्र अभय देण्यात येत असल्याचा आरोप शहरातील सर्व छोटे डिझायनर्स, फ्लेक्स प्रिंटिंग व्यावसायिक आणि होर्डिंग व्यवसायाशी संबंधित व्यक्तींनी केला आहे.

महानगरपालिकेच्या पक्षपाती कारभाराविरोधात नांदेड ग्राफिक्स डिझाईनर असोसिएशनच्या शिष्टमंडळाने महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत व मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांना निवेदन दिले.

यावेळी नांदेड ग्राफिक्स डिझाईनर असोसिएशनचे अध्यक्ष देवेंद्रसिंग चंदेल, उपाध्यक्ष शाम कांबळे, सचिव मल्लिकार्जुन एकलारे, सहसचिव गजानन नारखेडे, अशोक भोरगे यांच्यासह अनेक पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.



महापालिका प्रशासनाकडून सध्या मोठ्या जाहिरात एजन्सी, मोठे क्लासेस आणि प्रभावशाली लोकांच्या बेकायदेशीर होर्डिंग्सकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप या व्यावसायिकांनी केला आहे. याउलट स्वतःचा छोटा-मोठा व्यवसाय करून उदरनिर्वाह करणाऱ्या छोट्या डिझायनर्स आणि फ्लेक्स दुकानदारांवर मात्र नियमांचा बडगा उगारून पोलिसांत थेट गुन्हे दाखल करण्यात येत आहेत.

महापालिकेच्या या दुहेरी आणि पक्षपाती भूमिकेमुळे छोट्या व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. जर नियम असतील तर ते सर्वांसाठी समान असले पाहिजेत, अशी ठाम भूमिका घेत या व्यावसायिकांनी प्रशासनाला धारेवर धरले आहे. मोठ्या एजन्सीसाठी वेगळे नियम आणि छोट्या व्यावसायिकांसाठी वेगळे नियम, ही प्रशासनाची भूमिका अत्यंत अन्यायकारक असून, ही हुकूमशाही आता खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

या जाहिरात व्यावसायिकांनी आपल्या न्याय्य हक्कांसाठी महानगरपालिकेकडे प्रमुख मागण्यांचे निवेदन सादर केले आहे. यामध्ये नांदेड शहरातील सर्व मोठ्या होर्डिंग्सचे तत्काळ ऑडिट करण्यात यावे आणि कोणते होर्डिंग अधिकृत व कोणते अनधिकृत आहेत, याची संपूर्ण माहिती सार्वजनिक करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

# १३ गोवंशाची कसायाच्या तावडीतून सुटका

## बकरी ईदच्या दिवशीच हिमायतनगर पोलिसांची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** अवैधरित्या कत्तलीसाठी गोवंशीय जनावरे बांधून ठेवणाऱ्यावर हिमायतनगर पोलिसांनी धडक कारवाई करत १३ गोवंशीय जनावरांची सुटका केली. या कारवाईत अंदाजे २ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

हिमायतनगर पोलीस ठाण्यात या प्रकरणी चंद्रकांत गोविंदराव आरकिलवार यांनी फिर्याद दिली होती.

जिल्ह्यात अवैध गोवंशीय जनावर वाहतूक व कत्तलीसाठी बांधून ठेवणाऱ्यांविरोधात मोहीम सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार हिमायतनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमोल भगत यांना गोपनीय माहिती की, मुर्तुजा कॉलनी परिसरात कत्तलीच्या उद्देशाने टिनपत्र्याच्या शेडमध्ये बांधून ठेवण्यात आली आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसह घटनास्थळी छापा टाकला असता १३ गोवंशीय जनावरे अवैधरित्या बांधून ठेवलेली आढळून आली.

पोलिसांनी तत्काळ कारवाई करत जनावरांची सुटका केली व अंदाजे २ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी शेख जलील शेख खाजामिया, रा. रहीम कॉलनी, हिमायतनगर याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. सुटका करण्यात आलेल्या जनावरांना गोशाळेत दाखल करण्यात आले आहे.

# शांताबाई गुंडेकर यांचे निधन

**भोकर (प्रतिनिधी)–** शहरातील शेख फरीद नगर येथील रहिवासी शांताबाई सखाराम गुंडेकर यांचे दिनांक २८ मे २०२६ रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.



मृत्युसमयी त्या ६७ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर दिनांक २८ मे २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता हिंदू स्मशानभूमी भोकर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.

त्या सामाजिक कार्यकर्ते आदिनाथ गुंडेकर व भारतीय सैनिक अनिल गुंडेकर यांच्या

# महापालिकेत स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगरपालिकेतर्फे गुरुवार दि.२८ मे २०२६ रोजी मनपाच्या स्थायी सभागृह कक्षात स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी उपआयुक्त अजितपालसिंघ संधु यांच्या हस्ते सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील अग्रगण्य क्रांतिकारक, द्रष्टे समाजसुधारक, प्रखर राष्ट्रभक्त आणि प्रतिभावंत साहित्यिक होते. सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करणारे आणि अंदमानच्या तुरुंगात काळ्या पाण्याची अत्यंत कठोर शिक्षा भोगलेले ते स्वातंत्र्यसैनिक होते. याप्रसंगी नगरसेविका शांभवी साले, वरिष्ठ लिपीक शुभांगी चौधरी, स्वीय्य सहायक आनंदा खानसोळे यांच्यासह मनपाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ — ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com